# महाराष्ट्रातील शैक्षणिक स्थिती

## शिक्षण हक्क परिषद
## दिनांक १९ व २० जानेवारी २००१

**संकलन - बाल हक्क अभियान**
द्वारा- समर्थन, ८७/३, मुंबादेवी म्युनिसिपल शाळा, काळबादेवी, मुंबई - ४०० ००२.
दूरध्वनी : २४२ ५२९२, टेलिफॅक्स : २४२ ८२९१ ✉ Email : vsansad@bom3.vsnl.net.in
क्राय : ✆ ३०९ ६८४५ / ३०६ ३६५१

# प्रस्तावना

महाराष्ट्र हे खंडप्राय भारत देशामधील आर्थिक व राजकीयदृष्ट्या एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या या प्रगत चित्रामागे एका शिक्षण व त्या अनुषंगाने झालेल्या समाज परिवर्तनाच्या चळवळीची मोठी पार्श्वभूमी आहे

पिढ्यान्‌पिढ्या ज्ञानाची दारे येथील बहुजन समाजाला बंद ठेवून त्यांना आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अशा जीवनाच्या सर्व क्षेत्रातील गुलामगिरीमध्ये काही मूठभरांनी ठेवले होते. त्या गुलामगिरीला आव्हान वेळोवेळी या महाराष्ट्रातच मिळाले आहे. ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेल्या संतचळवळीपासून ते महात्मा फुले - शाहूमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, संत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज यांनी केलेल्या समाजपरिवर्तनाच्या चळवळीमध्ये 'शिक्षण' (लोकशिक्षण व औपचारिक शिक्षण) केंद्रस्थानी राहिले आहे. गेल्या १५० वर्षांमध्ये वरील धुरिणांनी केलेल्या शैक्षणिक - सामाजिक - राजकीय चळवळींनी काही मूठभरांच्या मक्तेदारीला आव्हान देऊन खऱ्या बहुप्रवाही लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली आहे. दलित, वंचित, शोषित घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून जागृत करून स्वत:च्या प्रगतीबरोबरच समाजाच्या विकासाचा मार्ग व पायंडा या चळवळीतून घातलेला दिसतो. आज देशभरामध्ये महाराष्टातील हे पायाभूत कार्य शोषित वंचितांच्या उन्नतीमध्ये दिशादर्शक ठरले आहे.

परंतु महाराष्ट्रामध्ये आज शिक्षणाचे चित्र अतिशय विदारक आहे. जवळजवळ ६० लाख मुले शिक्षणव्यवस्थेचा बाहेर आहेत व जी शाळांमध्ये जातात त्यांच्यातील निम्म्यांपर्यंत 'शिक्षण' पोहचतच नाही. बऱ्याच ठिकाणी शाळा उपलब्ध नाहीत, उपलब्ध शाळांपैकी निम्म्या शाळांना पक्क्या इमारती नाहीत, शाळा असली तरी शिक्षक नाहीत - शिक्षक नेमलेले असले तरी ते वर्गात हजर नाहीत आणि असले तरी गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेलच याची खात्री नाही. म्हणून एकूण दाखल केलेल्या मुलांपैकी ४३ टक्के मुलांची पहिल्या चार वर्षातच शाळेतून गळती होते.

या अहवालामध्ये प्रामुख्याने शासनाच्या आकडेवारामधून दिसणारे शिक्षणाचे चित्र आपणासमोर ठेवले आहे. त्याआधी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील शिक्षणविषयक धोरणे व कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. १९९० नंतर उदारीकरणाचे या धोरण अवलंबल्यानंतर आपली राष्ट्रीय शिक्षणव्यवस्थाही पूर्णपणे स्वायत्त राहिली नाही. जागतिक पातळीवर बदललेल्या शिक्षणविषयक धोरणांचा आपले राष्ट्रीय धोरण व कार्यक्रम ठरवण्यामध्ये महत्त्वाचा प्रभाव राहिला आहे. त्याचबरोबर शिक्षण हा मध्यवर्ती सूचीवरील विषय असल्यामुळे व महाराष्ट्राचे शैक्षणिक धोरण व कार्यक्रम राष्ट्रीय उद्दिष्टे, धोरणानुसार ठरत असल्यामुळे, महाराष्ट्रातील शिक्षणाचे वास्तव तपासताना राष्ट्रीय पातळीवरील धोरण, कार्यक्रम व नवीन घडामोडींचा परामर्श घेतला गेला आहे.

अहवालाच्या शेवटच्या भागामध्ये महाराष्ट्रामध्ये शिक्षण सर्व बालकांपर्यंत पोहचदण्याच्या व शिक्षणाची एकूण गुणवत्ता वाढवण्याच्या उद्देशाने जे अभिनव प्रयत्न बिगर शासकीय संस्थांनी चालवलेले आहेत, त्यांच्या कामाची माहितीही जोडली आहे.

हे प्रयोग ज्या घटकांपर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही, त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचवण्याच्या कामी स्पृहणीय असले तरी एकूणच प्रश्नाचा आवाका पाहता पुरेसे नाहीत. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी केंद्र व राज्यशासनाने धोरणात्मक व कार्यक्रमात्मक पातळीवर, युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत. त्यादृष्टीने तातडीने करावयाच्या बदलांसंदर्भात शिफारसी ही अहवालात सुचवल्या आहेत.

महाराष्ट्रातील शिक्षणाचे अहवालात उभे राहणारे चित्र व ते बदलण्यासाठी सुचवलेल्या शिफारसी या परिपूर्ण नाहीत याची आम्हांस कल्पना आहे. राज्यातंर्गत असणारी भौगोलिक, सामाजिक स्थिती लक्षात घेता शिक्षण व्यवस्था व पद्धती अधिक लवचिक व सर्व समावेशक होण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने आपल्याला आवश्यक वाटणारे मुद्दे, आपण बाल हक्क अभियानकडे जरुर पाठवावेत. अभियानाच्या पुढील आखणीमध्ये त्यांचा जरुर समावेश केला जाईल.

## प्राथमिक शिक्षण

### १. आंतरराष्ट्रीय दृष्टीक्षेप

अ) बाल हक्क करार

ब) सर्वांसाठी शिक्षण - जागतिक परिषद

### २. राष्ट्रीय चित्र

अ) राज्यघटनेमध्ये मुलांचे हक्क

ब) भारताचे शैक्षणिक धोरण

क) उदारीकरणानंतरचे बदलते शैक्षणिक चित्र

ड) भारतातील शैक्षणिक स्थिती

इ) राजकीय पक्ष व प्राथमिक शिक्षण

### ३. महाराष्ट्रातील शैक्षणिक चित्र

अ) राज्य कृती कार्यक्रम

ब) शिक्षणाची सद्यस्थिती

क) अर्थसंकल्पीय तरतूद

ड) महाराष्ट्रातील अभिनव प्रयोग

### ४. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शिफारसी

अ) महाराष्ट्रातील शिक्षणविषयक महत्त्वाची आकडेवारी

ब) राज्यशासनाने घेतलेले महत्त्वाचे निर्णय

**प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता :**

जगात जवळ जवळ ८५५ कोटी म्हणजेच एकूण जागतिक लोकसंख्येच्या ६१ टक्के लोक निरक्षर आहेत. विकसनशील देशामध्ये १३० कोटी पेक्षा ही जास्त मुले निरक्षर असून यात ७३ कोटी मुलींचा समावेश आहे. आणि कोट्यावधी मुलांना शिक्षण तर मिळत आहे परंतु त्या शिक्षणाची गुणवत्ता अगदीच खालच्या दर्जाची आहे.

लोकांना जर उत्पादक कार्य करायचे असले तर त्यांच्या स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्यासाठी आणि सांस्कृतिकदृष्ट्या प्रगल्भ जीवन जगण्यासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षणाच्या अभावी समाजामध्ये सामंजस्याने राहणे, लोकशाही, शांती, परस्पर सौहार्य आणि विशेषतः स्त्री - पुरुष समानता या तत्त्वाचा स्विकार व पुरस्कार करणे अवघड जाते. वैश्विक पातळीवर निरक्षरतेमुळे लोकशाही, सामाजिक विकास, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता या तत्त्वांनाच बाधा पोहचते. त्यामुळे व्यक्ती, समाज व राष्ट्राच्या उन्नतीसाठी प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे व गरजेचे आहे.

**आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राथमिक शिक्षणाची पार्श्वभूमी :**

संयुक्त राष्ट्राने शिक्षणाचा हक्क हा मानवी हक्काच्या जागतिक जाहिरनाम्यामध्ये १९४८ साली समाविष्ट केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक हक्कांचा पुरस्कार करण्याच्या प्रयत्नांची ही एक नांदी होती. १९८९ साली संयुक्त राष्ट्रांनी केलेला मुलांच्या हक्कांचा करार आणि त्या अनुषंगाने २ सप्टेंबर १९९० रोजी झालेला मुलांच्या हक्कांचा आंतरराष्ट्रीय कायदा या दोन गोष्टी मुलांचे हक्क जागतिक स्तरावर अबाधित राखण्याचे कार्य करतात. हा कायदा जगभरात सोमालिया आणि अमेरिका या दोन राष्ट्रांनी वगळता सर्वांनीच स्विकृत केला आहे. त्यामुळे आता मुलांच्या गरजा या गरजा न राहता ते आता त्यांचे हक्क म्हणून जागतिक स्तरावर पाहिले जातात.

बाल हक्क कराराच्या कलम २८/२९ नुसार प्रत्येक राष्ट्राने मुलांना त्यांच्या क्षमता पूर्णपणे विकसित करण्यासाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. जवळपास शाळा उपलब्ध असणे, मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा त्यांचा हक्क आहे. कलम २८ व २९ बरोबर करारातील पुढील कलमे मुलांच्या या हक्काचे अधिक विवेचन करतात. कलम २, कलम ३, कलम ६ यामध्ये मुलांचा जीविताचा आणि विकासाचा हक्क व कलम १२ नुसार मुलांना अभिव्यक्ती व स्वतःची मते असल्याचा अधिकार आहे. या करारामध्ये आणि इतर मानवी हक्कांच्या दस्तऐवजामध्ये लोकशाही व्यवस्थांसाठी शिक्षण ही एक मुलभूत अट आहे. मुलांचे शिक्षण आणि सामाजिक विकास यांचा परस्पर संबंध या करारात स्पष्ट केला आहे.

**सर्वांसाठी शिक्षण :**

सन १९९० मध्ये जॉमेटिअन थांयलड येथे गुणवत्तापूर्वक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी आणि विशेषतः गरीब देशामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकरण कसे गाठता येईल, यासाठी जागतिक परिषद भरली होती. या परिषदेत मुख्यतः दारिद्र्यनिवारण, स्त्रियांचे सक्षमीकरण, मुलांचे धोकादायक उद्योगात कामगार म्हणून होणारे शोषण, लैंगिक शोषण यापासून संरक्षण करण्यासाठी त्याचप्रमाणे मानवी हक्कांचा व लोकशाहीचा पुरस्कार करण्यासाठी, पर्यावरण संरक्षणासाठी व जागतिक पातळीवर वाढणाऱ्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी शिक्षण हाच एक उपाय आहे असा सार्वमतांने निष्कर्ष काढण्यात आला. जॉमेटिअन परिषदेच्या आधी शिक्षण म्हणजे फक्त प्राथमिक व माध्यमिक स्तरावर भरती इतकेच अपेक्षित होते परंतु जॉमेटिअन परिषदने शिक्षण म्हणजे मुलांची भरती नसून शिक्षणाची एकूणच गुणवत्ता उंचावणे आणि त्याचबरोबर शैशव व बाल्यावस्थेमध्ये मुलांची निगा व विकास, त्याचबरोबर मुलांना येणाऱ्या कुमार व प्रौढ वयातील जबाबदारीसाठी तयार करणे या मुद्द्यांवर भर दिला. या परिषदेमधून मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य, शिक्षण हे सहाव्या वर्षापासून सुरू न होता. शिक्षण जन्मापासून सुरू होते आणि हे बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाबरोबर समाजातील इतर घटकांची आहे. हे मुद्दे प्रकर्षाने पुढे आले व त्यास अनुसरून जागतिक स्तरावर पुढील सहा उद्दिष्टे या परिषदेत ठरवण्यात आली.

१) बालशिक्षण व त्यासाठी आवश्यक सुविधांचा प्रसार करणे.

२) सन २००० पर्यंत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण.

३) शिक्षणाचा किमान स्थर विशिष्ट वयोगटापर्यंत गाठणे

४) प्रौढ साक्षरतेच्या दरात वाढ आणि स्त्री साक्षरतेस प्राधान्य

५) मूलभुत शिक्षणाचा विस्तार 'युवक आणि प्रौढांचेही प्रशिक्षण'

६) जीवनाचा एकूण दर्जा टिकविणारे व स्थायी विकास गाठण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्य आणि तत्वांचा प्रसार.

जॉमेटियन परिषदेमुळे शिक्षणाचा प्रश्न हा पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर आणण्यास मदत झाली आणि त्यानंतरच्या संयुक्त राष्ट्रांच्या प्रत्येक सभा आणि परिषदांमध्ये शिक्षण या विषयाचा गांभीर्याने विचार झालेला दिसतो.

**शिक्षण म्हणजे नक्की काय?**

आंतरराष्ट्रीय बाल हक्क करारांमध्ये मुलांच्या विकासासाठी त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हा त्यांचा हक्क समजला गेला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणांमध्ये मुलांच्या बौद्धिक गरजांबरोबरच त्यांच्या शारीरिक, सामाजिक, मानसिक, भावनिक आणि अध्यात्मिक विकासाच्या गरजांचाही विचार केला गेला आहे. प्रत्येक मुलाला त्याच्या क्षमता व गरजेनुसार शिक्षण दिले गेले पाहिजे. शिक्षणाची गुणवत्ता या विषयांमध्ये पुढे स्त्री-पुरुष समता व समानता, आरोग्य आणि पोषण हे देण्यासाठी पालक आणि समाजाचा एकूण शिक्षण संस्थांच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग यावर या परिषदेमध्ये भर देण्यात आला. त्याचबरोबर शाळामध्ये मुलांना सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या सृजनशीलतेला वाव देणारे त्यांच्या गरजांचा आदर करून इतरांप्रती आदर आणि सामंजस्य शिकविणारे आणि मुलांच्या गरजांनुसार आवश्यक अभ्यासक्रम उत्साहाने शिकविणारे शिक्षक त्यांना मिळायला हवेत. आणि त्याचबरोबर प्रत्येक शाळेमध्ये पाणी आणि स्वच्छतागृह या मुलभूत सोयी - सुविधा पुरविल्या गेल्या पाहिजेत, तरच शिक्षण सर्वार्थाने त्यांच्यापर्यंत पोहोचले असा निष्कर्ष या परिषदेमध्ये काढण्यात आला.

## भारतीय राज्यघटना आणि मुलांचे हक्क

भारतीय राज्यघटनेच्या भाग ३ मध्ये मुलभूत अधिकार व भाग ४ मध्ये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. भाग ३ मध्ये दिलेले मुलभूत अधिकार हे न्यायालयीन मार्गाने अंमलात आणता येतात. म्हणजेच या अधिकारांचा जर भंग झाला किंवा राज्याने हे अधिकार अंमलात आणण्याजोगी परिस्थिती निर्माण केली नाही तर त्याविरुद्ध न्यायालयामध्ये दाद मागता येते. राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्व मात्र या पद्धतीने अंमलात आणता येत नाहीत. परंतु राज्यांनी राज्यकारभार हा या मार्गदर्शक तत्वांनुसार करणे अपेक्षित असते.

राज्यघटनेचे या चौथ्या भागातील अनुच्छेद ४५ हे मार्गदर्शक तत्त्व आहे. त्यानुसार ''राज्य हे संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षांच्या कालावधीच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयाच्या चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशील राहिल.

याच भागातील अनुच्छेद ३९(ङ) नुसार स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पडू नये.

अनुच्छेद ३९ (च) नुसार बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांचे शोषणापासून आणि नैतिक आणि भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण व्हावे.

अनुच्छेद ४१ (च) नुसार राज्य हे आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत, कामाचा, शिक्षणाचा अधिकार आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबातीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत सरकारी साहाय्याचा अधिकार उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.

अनुच्छेद ४६ नुसार राज्य हे दुर्बल तर जनवर्ग आणि विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील.

## शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण : भारतातील स्थिती

### पार्श्वभूमी :

सन १९४८ मध्ये भारताने लोकशाही व्यवस्था स्विकारून सन १९५० मध्ये आपले संविधान तयार केले. या राज्य घटनेच्या अनुच्छेद ४५ नुसार, राज्य घटना स्विकारल्याच्या १० वर्षाच्या आत म्हणजेच १९६० सालापर्यंत १४ वर्षाखालील प्रत्येक मुलाला राज्याने मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे असे नमूद केले आहे.

स्वातंत्र्याच्या ५० वर्षांनंतरही भारतामध्ये कोट्यवधी मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले आहे ही वस्तुस्थिती आहे.

**सन १९९३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने उन्नीकृष्णन् विरुद्ध आंध्रप्रदेश सरकार या महत्त्वपूर्ण खटल्यामध्ये ६ ते १४ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मिळणे हा त्यांचा मुलभूत हक्क असल्याचे स्पष्ट केले आहे.** हा निकाल बालहक्क अबाधित ठेवण्याच्या कामी महत्त्वाचा असूनही तो पुरेसा नाही. लोक प्रतिनिधींनी संसदेमध्ये कायदा करून सर्वच बालकांना शिक्षण हा मुलभूत हक्क म्हणून दिला गेला पाहिजे. त्यासाठी केंद्रीय मानव संसाधन विकास खात्याने १९९७ साली ८३व्या .०००घटना दुरुस्तीचे विधेयक राज्यसभेत मांडले होते. या विधेयकानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणे ही राज्याची जबाबदारी आहे आणि प्रत्येक मुलाचा तो मुलभूत हक्क आहे.

### भारताचे शैक्षणिक धोरण :

सन १९८६ मध्ये भारती शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी काळाला अनुरुप अशी शिक्षण पद्धती विकसित करण्यासाठी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखले गेले. बऱ्याच अभ्यासाअंती आखलेल्या या नवीन शैक्षणिक धोरणांने पुढील मुद्द्यांवर भर दिला.

१) पूर्ण देशांमध्ये एकच राष्ट्रीय शिक्षण पद्धतीचा विकास.

२) शिक्षण क्षेत्रातील असमानता नष्ट करणे.

३) सर्व देशामध्ये एकच अभ्यासक्रम तयार करणे. या अभ्यासक्रमाचा मुख्य गाभा समानता, लोकशाही धर्मनिरपेक्षता आणि भारताची सांस्कृतिक विविधता यावर आधारित असेल.

४) शिक्षण ही एक सष्ट्रीय जबाबदारी.

५) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण.

६) साक्षरतेचा प्रसार.

७) तंत्रज्ञान आणि शास्त्र विषयांतील संशोधनाला प्रोत्साहन

८) दलित, आदिवासी, अल्प-संख्याक अपंग आणि शैक्षणिकदृष्ट्या मागसलेल्या वर्गांच्या शैक्षणिक विकासासाठी विशेष प्रयत्न.

९) बालशिक्षण व प्रौढ शिक्षणावर भर.

१०) प्राथमिक शाळांमध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देणे. एक वर्ग, एक शिक्षक या नुसार शिक्षकांची भरती.

११) तंत्रशिक्षण, रोजगार विषयक शिक्षण आणि उच्च शिक्षण यांचा ग्रामीण भागामध्ये प्रसार

१२) आठव्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च शिक्षणासाठी होईल अशी तरतूद करणे.

या धोरणांना अनुसरून एक कृती कार्यक्रम देश पातळीवर ठरविला गेला. या कृती कार्यक्रमात नमूद केलेली प्राथमिक शिक्षणासाठीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) शैशवावस्थेतील निगा आणि बालशिक्षण :**

- सद्यस्थिती चालणाऱ्या बालवाड्या आणि बालशिक्षण देणाऱ्या इतर संस्था आणि कार्यक्रम (आय. सी. डी. एस. याचे सक्षमीकरण आणि विस्तार)
- ० ते ६ वयोगटातील किमान ७० टक्के मुलांना बाल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे.
- आय. सी. डी. एस. अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

**२) प्राथमिक शिक्षण :**

- ऑपरेशन ब्लॅक बोर्ड - अंतर्गत प्राथमिक शाळांना सर्व सोयी सुविधा पुरविणे.
- सन २००० पर्यंत ज्या भागामध्ये माध्यमिक शाळा नाहीत तिथे माध्यमिक शाळा सुरू करणे.
- १४ वर्षाखालील प्रत्येक मूल शाळेत भरती होईल आणि टिकेल, त्याचबरोबर शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यावर भर.
- लोकसंख्या आणि स्थानिक निकषांच्या आधारावर अंमलबजावणी.

या शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी सन १९९० साली एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल १९९० साली शासनाला दिला. सन १९९१ मध्ये हा अहवाल अभ्यासण्यासाठी आणि त्याप्रमाणे शैक्षणिक धोरणात बदल सुचविण्यासाठी आणखी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या शिफारशी केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने स्विकारल्या व त्यानुसार १९९२ मध्ये शैक्षणिक धोरणात बदल करण्यात आले. परंतु एकूणच पाहता १९८६ साली शैक्षणिक धोरण हे भारतीय शिक्षण व्यवस्थेचा साकल्याने विचार करणारे व शिक्षण या संकल्पनेचा मुलगामी विस्तार करणारे धोरण होते यात शंका नाही. या धोरणाने संपूर्ण देशामध्ये एक शिक्षणपद्धती सुचविली आणि एकूणच शिक्षणाचा मुद्दा विकास प्रक्रियेशी जोडण्यास मदत केली.

पुढे सन १९९३ मध्ये शैक्षणिक क्षेत्रात दोन महत्त्वाच्या गोष्टी प्राथमिक शिक्षणा संदर्भात घडल्या -

१) भारताने शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आंतरराष्ट्रीय करारावर सही केली आणि त्यामुळे प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय सहाय्य मिळण्यास मदत झाली.

२) दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने उन्नीकृष्णन खटल्यामध्ये शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मुलभूत अधिकार असल्याचा निकाल दिला.

न्यायालयाच्या या निकालामुळे देशभरामध्ये शासनाची प्राथमिक शिक्षणाप्रति घटनात्मक जबाबदारी या मुद्यांवर अनेक चर्चा आणि वादविवाद उद्भवले या खटल्यानंतर शासनावर सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची जबाबदारी येऊन पडली आणि त्यासाठी आवश्यक संसाधने गोळ्या करण्याची निकड भासली. तेव्हा घटनेमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव पुढे आला. त्यानुसार ८३ व्या घटना दुरुस्तीचे विधेयक राज्यसभेत १९९७ साली सादर करण्यात आले. हे विधेयक लोकसभेमध्ये अजूनही सादर व्हावयाचे आहे.

त्यानंतर लगेचच आलेल्या ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीने पंचायती राज व्यवस्थांमार्फत सत्तेच्या आणि प्रशासनाच्या विकेंद्रीकरणास हातभार लावला. परंतु त्यानंतर येणाऱ्या आंतरराष्ट्रीय अर्थसाहाय्यावर आधारित विशेषत: विश्वबँकेच्या अनुदानावर आधारित शिक्षणाच्या योजनांचा गाभा जरी विकेंद्रीकरण आणि स्थानिक व्यक्ती व संस्थाचा सहभाग हा असला तरी या योजनांमध्ये व्यवस्थापन मात्र त्या गाभ्याशी विसंगत आहे.

सध्या भारतांमध्ये बाह्य अर्थसहाय्यावर चालणाऱ्या प्रमुख प्रकल्पांची माहिती खालील प्रमाणे आहे.

☛ **आंध्रप्रदेश प्राथमिक शिक्षण प्रकल्प १९८३.**'ओ. डी. ए.'(डी.एफ.आय.डी)

☛ **बिहार शिक्षण प्रकल्प** - भारतातील पहिला प्रकल्प ज्यामध्ये 'सर्वांसाठी शिक्षणा'चे सर्व निकष सामाविण्यात आले होते. एकूण ३५४० कोटीचे अनुदान मुख्यत: 'युनिसेफ' कडून.

- महिला समख्य - उत्तर प्रदेश, कर्नाटक, गुजरात आणि आंध्र प्रदेश या चार राज्यात स्त्रियांच्या सबळीकरणासाठी अर्थसहाय्य - नेदरलँड सरकार
- लोक जुबिष - सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण - यासाठी लोक आंदोलन - स्वीडश इंटरनॅशनल ॲथॉरिटी सीडा तर्फे अर्थसहाय्य आणि सन २००० पर्यंत राजस्थानमध्ये सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण.
- शिक्षाकर्मी प्रकल्प - अर्थ सहाय्य एस. आय. डी. ए. (सीडा) - शिक्षकांच्या गैरहजेरीचा प्रश्न सोडविण्यासाठी राजस्थानमध्ये अर्थ सहाय्य
- उत्तर प्रदेश प्राथमिक शिक्षण प्रकल्प - विश्व बँकेकडून रु. २७८० कोटीचे ७ वर्षांकरीता अनुदान

आणि अखेर १९९३ मध्ये वरील सर्व प्रकल्पांचा आढावा घेऊन डी.पी.इ.पी. कार्यक्रम कार्यवत केंद्रीय मानव संसाधन खात्याच्या अहवालामध्ये हा प्रकल्प `the primary education component of social safety Net adjustment credit financed by IDA ' असल्याचे म्हटले आहे.

## भारतातील शैक्षणिक स्थिती

### शैक्षणिक सुविधा

- भारतात एकूण ५,८६,४६५ खेडी आहेत आणि १०,६०,६१२ वस्त्या आहेत. यापैकी ४९.७९ टक्के वस्त्यांमध्ये त्याच परिसरांमध्ये शाळेची सोय आहे.
- एकूण १८.५६ टक्के वस्त्यांमध्ये एक किलोमीटरच्या आत शाळेची सोय आहे.
- जवळजवळ १०.७२ टक्के वस्त्यांमध्ये शाळेची सोय दोन किलोमीटरच्या आत आहे.
- एकूण पाहात ८३.३६ टक्के वस्त्यांना १ किलोमीटरच्या आत शाळा आणि ९४.८ टक्के ग्रामीण वस्त्यांना २ किलोमीटरच्या आत शाळेची सोय आहे. आणि उरलेली ५.९२ टक्के वस्त्यांना शाळा २ कि.मी. च्या पुढे आहे.

लोकसंख्येच्या भाषेत बोलायचे झाले तर एकूण ग्रामिण लोकसंख्येच्या ७७.८१ टक्के लोकसंख्येस प्राथमिक शाळा त्यांच्या वस्तीच्या ठिकाणी आहे. ९३.७६ टक्के लोकांना, १ कि.मी.च्या आत शाळा उपलब्ध आहे. आणि ९८ टक्के लोकांना २ कि.मीच्या आत शाळा नाही त्या लोकसंख्येपैकी ६० टक्के वस्त्यांची लोकसंख्या ५०० पेक्षा कमी आहे.

★ यापैकी ५,८०,५९० वस्त्या अशा आहेत की जिथे ३०० पैकी अधिक वस्ती आहे आणि यातील ९३ टक्के वस्त्यांना १ कि. मी.च्या आत शाळा उपलब्ध आहे.

★ यापैकी ६१.६७ टक्के वस्त्यांमध्ये प्रामुख्याने अनुसूचित जमातीचे लोक रहातात.

★ औपचारिक शिक्षण पद्धती व्यतिरिक्त शाळाबाह्य मुलांना प्राथमिक शिक्षण पुरविण्यासाठी अनौपचारिक शिक्षण कार्यक्रमही राबविले जातात.

★ कर्नाटक, नागालँड, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, लक्षद्वीप आणि पाँडेचरी या राज्यांमध्ये हा कार्यक्रम राबविला जात नाही.

★ देशभरामध्ये आज एकूण १,२०,५४४ अनौपचारीक शिक्षण केंद्रे आहेत. यापैकी ९४.५२ टक्के ग्रामीण भागात तर ५.४८ टक्के शहरी भागात आहेत.

★ ग्रामीण भागात उत्तर प्रदेशामध्ये सर्वात जास्त (४०,४५९), मध्यप्रदेश (२२, ६४७), आंध्रप्रदेश (१९,३३०), ओरिसा (१०,७६३), आसाम (८,३३८) अशी केंद्रे आज चालू आहेत.

★ केंद्रशासित प्रदेशामध्ये चंदिगढ, दिल्ली व अंदमान - निकोबार या बेटांवर अनुक्रमे ३०,१९ आणि ९ केंद्र चालविली जातात.

★ शहरी भागामध्ये आंध्र प्रदेशात २,८५०, मध्य प्रदेश २,२३०, उत्तर प्रदेश ७२८, ओरिसा १९६, आणि आसाम ९१ केंद्र चालविली जातात.

★ ग्रामीण भागामध्ये चंदिगढ येथे ७५ केंद्रांमधून अनौपचारिक शिक्षण दिले जाते आणि शहरी भागात दिल्लीमध्ये अशा प्रकारची ६० केंद्र आहेत.

### प्राथमिक शिक्षण :

★ देशात एकूण ८,२२,४८६ शाळा आहेत. यापैकी ६९-३६ टक्के या माध्यमिक आणि २.८८ टक्के उच्च माध्यमिक शाळा आहेत (२९ टक्के)

★ एकूण ५,०,४५५ प्राथमिक शाळांपैकी ५,०७,५८१ (८८.९८ टक्के) शाळा ग्रामीण भागात आहेत. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचे ग्रामीण भागातील प्रमाण अनुक्रमे ७९.३९ टक्के ७३.०१ टक्के आणि ४९.०२ टक्के एवढे आहे.

★ प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी राज्य सरकारची असल्यामुळे जास्तीत जास्त प्राथमिक (९२.१० टक्के) उच्च प्राथमिक (७९.४५) टक्के शाळा या शासनाच्या प्रत्यक्ष किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व्यवस्थापनाखाली आहेत.

★ प्राथमिक शाळामध्ये १-४ वर्गात एकूण भरतीपैकी ७४.६९ टक्के भरती ग्रामीण भागातून , २५.३१ टक्के भरती शहरी भागातून आहे.

★ इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये भरती केलेल्या मुलांपैकी अनुसुचित जातींची मुले १९.६२ टक्के आणि अनुसूचित जमातींची ९.८ टक्के मुले आहेत. आणि यामध्ये मुलींचे प्रमाण अनुक्रमे ४१.६६ टक्के व ४१.४५ टक्के आहे.

**बालशिक्षण :**

★ बालशिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये बालवाडी, अंगणवाडी, खाजगी बालवाड्या आणि सरकारी शाळेला जोडून काढलेल्या बालवाड्या यांचा समावेश होतो.

★ देशभरात एकूण १,७४,५४० खेड्यांमध्ये बालशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. त्यापैकी १,५८,७७९ आंगणवाड्या, ७,३८६ स्वतंत्र खाजगी बालवाड्या, आणि १७,४७९ खेड्यांमध्ये शाळेला जोडून असलेल्या बालवाड्या आहेत.

★ देशातील एकूण खेड्यांच्या फक्त २९.७६ टक्के खेड्यांमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

★ आसाम, बिहार, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मिर, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यात ३० टक्के पेक्षाही कमी खेड्यांना बालशिक्षणाची संधी उपलबध आहे.

★ मणिपूर, सिक्कीम, त्रिपुरा, दादरा आणि नगर हवेली आणि पाँडेचरी या राज्यातील ८० टक्के पेक्षा जास्त खेड्यांतून पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.

★ बालवाड्यांमध्ये शिकविणाऱ्या एकूण शिक्षकांपैकी ९७.१५ टक्के या स्त्री - शिक्षिका आहेत.

★ बालवाड्यांमध्ये जाणाऱ्या ४७.८३ टक्के मुली आहेत.

**अपंग मुलांसाठी शिक्षण :**

पूर्ण देशभरासाठी अपंग मुलांसाठी एकूण ९०२ शाळा आहेत. यापैकी ६३० शाळा शहरी भागात आहेत. आणि बाकीच्या ग्रामीण भागामध्ये आहेत.

★ शहरी भागातील शाळापैकी ५.२४ टक्के शाळा फक्त मुलींसाठी, १५.४० टक्के शाळा फक्त मुलांसाठी आणि उरलेल्या ७९.३६ टक्के शाळा या मुले आणि मुलींसाठी आहेत.

★ ग्रामीण भागामध्ये हेच प्रमाण फक्त मुलींसाठी ४.४ टक्के शाळा २०.२२ टक्के फक्त मुलांसाठी आणि उरलेल्या ७५.७४ टक्के शाळा मुलां - मुलींसाठी आहेत.

★ या ९०२ शाळांपैकी, ४१८ शाळा या मूक - बधिर मुलांसाठी, ३६६ शाळा अस्थिव्यंग असणाऱ्या मुलांसाठी, २८८ अंध मुलासाठी आणि २४३ शाळा मंदबुद्धी मुलांसाठी आहेत. या शाळांपैकी मुलींसाठी खूपच कमी शाळा आहेत.

★ एकूण ४७,२६२ अपंग मुलांपैकी ९,८४३ (२०.८३ टक्के) मुले ग्रामीण भागात तर ३७,४१९ (७९.१७ टक्के ) मुले शहरी भागामध्ये शिक्षण घेत आहेत.

**शिक्षक :**

★ आज सर्व देशात एकूण ४१,९७,५५५ शिक्षक आहेत.

★ यापैकी ३८.६७ टक्के प्राथमिक शाळेत, २६.९१ टक्के उच्च प्राथमिक शाळेत आहेत.

★ देशातील बहुसंख्य शाळा, ३,५३,८७९ म्हणजेच एकूण शाळांपैकी ६२.६३ टक्के या एक शिक्षकी किंवा २ शिक्षकी शाळा आहेत.

★ एकुण देशांतील ५,७०,४५५ प्राथमिक शाळांपैकी ९२,८०१ शाळांना (१६.२७ टक्के) इमारतींची सोय नाही. या शाळा कच्च्या इमारती, झोपड्या, तंबू किंवा रिकाम्या जागेतच चालतात.

★ एकूण प्राथमिक शाळांपैकी ४४.२३ टक्के शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे.

★ १८.९३ टक्के शाळांमध्ये स्वच्छता गृहांची सोय आहे.

★ एकुण शाळांपैकी १०.८६ टक्के शाळांमध्ये शौचालयाची सुविधा आहे. त्यापैकी ५.१२ टक्के शौचालये फक्त मुलींकरीता आहे.

वर सादर केलेल्या आकडेवारीतूनही प्राथमिक शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या कामी आपण किती मागे आहोत, हे दिसून येते बऱ्याच वेळेस आकड्यांच्या भाषेतील सरकारी दस्तऐवजातून एक फसवे चित्रही उभे राहण्याची शक्यता असते. उदा. कागदोपत्री शाळा जरी उपलब्ध असली तरी इतर बाबी उदा. शाळेत शिक्षक वेळेवर येतात का? गावात जरी शाळा असली, तरी बारा महिने मुले तिथे असतात का? शाळेत जाऊ शकतात का? हे व असे अनेक मुद्दे आहेत. ज्यांचा शिक्षण मुलांपर्यंत पोहचवण्याच्या कामी प्रभाव पडत असतो. एका स्वयंसेवी संस्थेने या मुद्द्यांचा विचार करून बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेश व हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये एक अभ्यास केला. भारतामध्ये सामाजिक विकास व शिक्षणाच्या बाबत ही राज्य जरी इतर राज्यांच्या तुलनेत मागासलेली असली तरी या पाहणीतून पुढे आलेले निष्कर्ष हे देशभरातील शिक्षणाच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारे आहेत. त्यामुळे या पाहणीतील प्रमुख मुद्दे इथे दिले आहेत.

१) **शिक्षणातील भौगोलिक व सामाजिक विषमता** :- वेगवेगळ्या राज्यांनुसार व सामाजिक परिस्थितीनुसार साक्षरता व शिक्षणाचे प्रमाण कमी जास्त आढळते. उदा. केरळमध्ये संपूर्ण साक्षरतेचे उद्दिष्ट गाठलेले आहे. परंतु राजस्थानमधील काही अनुसूचित जातींमधील स्त्रियांमध्ये पूर्ण निरक्षरता असल्याचे आढळून येते महाराष्ट्रातील सातारा, सांगली या जिल्ह्यांच्या तुलनेत बीड, गडचिरोली हे जिल्हे अतिशय मागासलेले आहेत. सर्वच अनुसूचित जाती व जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी पारधी व कातकरी या जमातींमध्ये ते ५ टक्केदेखील नाही.

२) **संथ गतीने बदल** : एकूण आकडेवारीवर नजर टाकली असता १९५० च्या तुलनेत १९९१ मध्ये साक्षरतेचे एकूण प्रमाण वाढलेले दिसते. परंतु या बदलांची गती मात्र अतिशय संथ व विषम आहे. एकूण लोकसंख्येमध्ये साक्षर लोकांचे प्रमाण वाढलेले दिसत असले तरी एकूण निरक्षरांची संख्याही वर्षानुवर्षे वाढतानाच दिसत आहे.

उदा. ५ व त्यापेक्षा जास्त वयोगटातील निरक्षरांची संख्या १९८१ साली ३५० कोटी होती ती १९९१ साली ३७१ कोटी झाली आहे.

भारतातील साक्षरता व शिक्षण प्रसाराची तुलना इतर देशांशी केली असता, जे देश १९५० साली एकाच स्तरावर होते, ते आज भारताच्या कितीतरी पुढे गेलेले दिसून येतात. उदा. चीन व दक्षिण कोरिया आज भारतामध्ये १५-१९ या वयोगटातील ३४ टक्के लोक अशिक्षित आहेत. चीनमध्ये हे प्रमाण ५ टक्के च्या आसपास आहे.

३) **राज्यांची निष्क्रियता** : भारताच्या विदारक शैक्षणिक परिस्थितीचे महत्त्वाचे कारण राज्य सरकारांची निष्क्रियता हेच आहे. ही निष्क्रियता शाळांना योग्य सुविधा न पुरवणे, शाळेतील कामकाजाचे योग्य पर्यवेक्षण न करणे, दुर्गम भाग व वंचित घटकांपर्यंत शिक्षणाच्या सोयीच न पुरवणे अशा विविध बाबींतून दिसून येते. गेल्या काही वर्षात तर वर्षानुवर्षे ज्यांना शिक्षण पोहोचले नाही, त्यांची पूर्णवेळ व योग्य गुणवत्तेचे शिक्षणापासून वंचनाच करण्याचे काम धोरणात्मक पातळीवर चाललेले दिसून येते. अनौपचारिक शिक्षण वर्ग, एकच शिक्षक अनेक वर्गांना शिकवणार, अंशकालीन वर्ग ही या वंचनेची उदाहरणे आहेत.

भारतामध्ये प्राथमिक शिक्षण हा विषय मध्यवर्ती सूचीमध्ये समाविष्ट केलेला आहे असे असले तरी राज्य सरकारेच प्राथमिक शिक्षणाची धुरा वाहताना दिसत आहेत. त्यामुळे राज्याराज्यानुसार प्राथमिक शिक्षणाची परिस्थितीही वेगळी असलेली दिसून येते.

★ आजही केरळसारख्या खूप थोड्या राज्यांमध्ये सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट गाठलेले दिसते. आंध्रप्रदेश व हिमाचल प्रदेशमध्ये या दृष्टीने चाललेले प्रयत्न वाखाणण्यासारखे आहेत. परंतु बहुतांश राज्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न खालील मुद्द्यांवर रखडत पडलेला दिसतो.

★ विद्यार्थ्यांचे शिक्षक संख्येशी विषम गुणोत्तर

★ केंद्रसरकारकडून शिक्षणासाठी आलेल्या अनुदानाचा पुरेसा विनियोग न करणे.

★ अस्तित्वात असलेल्या योजनांची योग्य अंमलबजावणी न होणे - ऑपरेशन ब्लॅकबोर्ड, संपूर्ण साक्षरता अभियान

★ दुय्यम दर्जाच्या शैक्षणिक उपक्रमांवर वाढती भिस्त उदा. अनौपचारिक शिक्षा वर्ग, अंशकालीन वर्ग इत्यादी.

शिक्षणाच्या या परिस्थितीस शासन जसे जबाबदार आहे. त्याचप्रमाणे समाजात व शासनव्यवस्थेत पसरलेले काही गैरसमजही तितकेच कारणीभूत आहेत. प्रोब या अहवालात गैरसमजांचाही आढावा घेतला आहे. यातील प्रचलित गैरसमज पुढीलप्रमाणे —

१. **मुलांच्या पालकांनाच शिक्षणात रस नसतो** : सर्वसामान्यपणे आणि विशेषत: शाळा व शैक्षणिक अधिकाऱ्यांशी बोलताना वारंवार हे उद्‌गार येतात की 'आम्ही आमच्या परिने प्रयत्न तर करीत आहोत. परंतु पालकच मुलांना शाळात पाठवत नाहीत' प्रोवने केलेल्या पाहणीत अगदी निरक्षर असलेल्या पालकांनाही आपल्या मुलांनी शाळेत जावे असेच वाटते. त्यांनी घेतलेल्या पालकांच्या पाहणीचा अहवाल खाली दिला आहे.

प्रोबने केलेल्या पाहणीनुसार ९८ टक्के ग्रामीण अशिक्षित पालकांना त्यांच्या मुलांनी तर ८९ टक्के पालकांना त्यांच्या मुलींनी शिकावे असे वाटते यापैकी ८० टक्के लोकांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असे म्हटले आहे. १७ टक्के लोकांनी माहीत नाही असे उत्तर दिले आहे. तर ३ टक्के लोकांनाच फक्त हे शिक्षण सक्तीचे असून नये असे वाटते.

२. **शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामध्ये बालमजुरी हा एक अडथळा आहे** : भारतामध्ये आज जवळजवळ १११ कोटी बालमजूर आहेत. बालमजुरी हा निश्चितच त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहचवण्याच्या कामातील अडथळा आहे. परंतु बालमजुरीचे वेगवेगळे प्रकार पाहता त्यांच्यापर्यंत वेगळ्या पद्धतीने शिक्षण पोहोचवता येणे शक्य आहे. बरेचसे बालमजूर हे खरे तर घरच्या किंवा शेतीच्या कामात व्यस्त असतात. १२ तास किंवा त्याहून जास्त वेळ काम करणाऱ्या बालवेठबिगारांचा प्रश्न अधिक गंभीर आहे. परंतु शेती व इतर ग्रामीण उद्योगांमधील बालमजुरांपर्यंत शिक्षण व्यवस्थेत थोडेफार फरक करून, या मुलांच्या सोयीने वेळ व जागा ठरवून त्यांच्यापर्यंत शिक्षण निश्चितच पोहचवले जाऊ शकते.

३. **प्राथमिक शिक्षण मोफत आहे** : राज्य घटनेच्या कलम ४५ नुसार, जरी शिक्षण मोफत असले तरी त्याचा अर्थ फक्त शिकवण्याची फी आकारली जात नाही एवढाच होतो. पालकांना इतर खर्च - गणवेष, पुस्तके, जाण्यायेण्याचा खर्च हा करावाच लागतो. एका पाहणीनुसार उत्तर भारतातील प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या एका मुलासाठी त्याच्या पालकांना वार्षिक सरासरी ३१८ रुपये खर्च येतो. घरामध्ये शाळेत जाणारी एकापेक्षा जास्त मुले असली तर गरीब पालकांना हा बोजा परवडत नाही. एवढा खर्च करून शाळेत जाणाऱ्या या मुलांकडे सर्व पाठ्यपुस्तके असतातच असे नाही. त्याचबरोबर गणवेष व दप्तराची लक्तरे लोंबत असतात तो भाग वेगळाच..

४. **शाळा उपलब्ध आहेत** : आधी सादर केलेल्या शासकीय आकडेवारीनुसार भारतातील ९५ टक्के वस्त्यांमध्ये शाळा २ किमीच्या अंतरावर उपलब्ध आहेत. प्रश्न इथे फक्त भौगोलिक अंतराचा नाही.

दोन किंवा एक किलोमीटरच्या परिसरामध्ये जरी शाळा उपलब्ध असली तरी दुर्गम, डोंगराळ भाग, नदी, ओढा, जंगल, अशा बाबींमुळे मुलांना प्रत्यक्ष शाळेपर्यंत पोहोचता येत नाही. दुर्गम भागातील शाळांमध्ये शिक्षकांच्या अनुपस्थितीचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर आहे.

घटनेतील सध्याच्या तरतुदीप्रमाणे वयाच्या १४ व्या वर्षांपर्यंत शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे. सध्या उपलब्ध असलेल्या शाळा या बहुतांशी ४थी पर्यंतच आहेत. त्यानंतर उच्च प्राथमिक शाळांचे प्रमाण मात्र अगदीच कमी आहे. त्यामुळे तिसरी - चौथीनंतर या मुलांना शाळा उपलब्धच नसते किंवा अधिक अंतर पार करून दुसऱ्या गावातील शाळांमध्ये जावे लागते

यामध्ये लागणारा वेळ व घरापासूनचे अंतर यामुळे विशेषत: मुलींचे पालक त्यांना पाठवायला राजी नसतात.

भौगोलिक अंतरापेक्षाही गावांतील असलेले सामाजिक अंतरही मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणाम करते. अनुसूचित जाती जमाती व विशेषत: मुलींच्या शिक्षणाच्या आड गावातील व शिक्षणव्यवस्थेत असणाऱ्या या सामाजिक अंतराचा निश्चितच फरक पडतो.

### प्राथमिक शिक्षण व राजकीय पक्षांची भूमिका

गेल्या त्रेपन्न वर्षामध्ये प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आपण गाठू शकलो नाही, याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे प्राथमिक शिक्षण हा प्रश्न कधीही भारताच्या राजकारणात महत्त्वाचा नव्हता संसदीय लोकशाहीमध्ये ज्या पक्षाचे सरकार निवडून सत्तेत आहे व जो विरोधात आहे. त्या दोघांचाही धोरण ठरवण्यात व त्याच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वाचा वाटा असतो. भारतातील प्रमुख राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यांचा अभ्यास केला तर त्यामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मुद्द्यांचा अंतर्भाव केलेला दिसत. परंतु अंमलबजावणीच्या पातळीवर मात्र अजूनही ही लक्ष्ये गाठण्यासाठी पुरेसे प्रयत्न दिसत नाहीत.

| पक्ष | १९९६ जाहिरनामा | १९९८ जाहिरनामा |
|---|---|---|
| भाजपा | ● शिक्षणावरील खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के इतका करणार<br>● शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शिक्षण मोफत करणार.<br>● शाळेतील गळती थांबविण्यासाठी व किमान ८० टक्के मुलांची शाळेत भरती करण्यासाठी विविध प्रोत्साहनपर योजना राबवणार | ● शिक्षणावरील खर्च वाढवत जाऊन राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के व त्याहून जास्त करणार<br>● लोकसहभाग वाढवून सन २०१० पर्यंत निरक्षरांचे संपूर्णपणे निर्मुलन<br>● देशव्यापी शिक्षण सुधार अभियान<br>● प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य देऊन मुलांच्या भरतीसाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांची मदत घेणार. बालशिक्षण व शैशवनिगा याबाबींचा प्राथमिक शिक्षणव्यवस्थेत समावेश<br>● मुलांची शाळेत अधिकाधिक भरती होण्यासाठी व ती शाळेत टिकण्यासाठी विनामुल्य पाठ्यपुस्तके पुरवणे, त्यांना पोषक आहार देणे व भत्ता देणे |
| काँग्रेस | ● सन २००१ पर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण<br>● मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य | ● प्रत्येक मुलाला वयाच्या १४व्या वर्षापर्यंत मोफत शिक्षण हा त्याचा मुलभूत हक्क म्हणून मिळाला पाहिजे यासाठी घटनेमध्ये दुरुस्ती<br>● प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणार. सक्ती फक्त पालक व मुलांवर नसून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देण्याची सक्ती सरकारवरही आहे.<br>● शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी दुपारच्या जेवणाची सोय व शिक्षण हमी योजना पंचायतींतर्फे राबवून घेणार. |
| जनता दल | ● शिक्षणावरील एकूण खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के इतका करणार. व त्यातील ५० टक्के खर्च हा प्राथमिक शिक्षणावर करणार.<br>● शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी मिड - डे मिलची योजना राबविणार | ● प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क मिळालाच पाहिजे.<br>● साक्षरता प्रसार कार्यक्रमातून सन २०१० पर्यंत संपूर्ण साक्षरता.<br>● कोठारी कमिशनच्या शिफारशीनुसार शिक्षणावरील खर्च ६ टक्के करणार आणि |

| पक्ष | १९९६ जाहिरनामा | १९९८ जाहिरनामा |
|---|---|---|
| | ● शेजार शाळांची संकल्पना राबवणार | त्यातील ५० टक्के प्राथमिक शिक्षणावर करणार<br>● उर्दु बहुभाषिक विभागामध्ये केंद्रशासन अनुदानित उर्दु प्राथमिक शाळा चालवून शिक्षण व साक्षरतेचा प्रसार करणार. |
| भारतीय कम्युनिस्ट पक्ष | ● वयाच्या १४ व्या वर्षा पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण<br>● राष्ट्रीय उपन्नाच्या ६ टक्के खर्च शिक्षणावर | ● राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान १० टक्के व राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातील किमान ३० टक्के खर्च शिक्षणावर<br>● वयाच्या १४ वर्षापर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण सर्व मुलांना देण्यासाठी कायदा करणार.<br>● प्रौढ साक्षरता कार्यक्रम राबविणार. |
| मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष | ● ०.१४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण<br>● राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान १० टक्के व राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातील किमान ३० टक्के खर्च शिक्षणावर करणार | ● सर्व मुले शाळेत जातील व निरक्षरतेचे संपूर्ण निर्मुलन<br>● ८३व्या घटनादुरुस्तीमध्ये संशोधन करून वयाच्या १४ वर्षांपर्यंत सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मुलभूत हक्क म्हणून देणार. |

## महाराष्ट्रातील शैक्षणिक चित्र

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलात कसे आणता येईल हे ठरवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध समित्या नेमल्या होत्या. प्रा. राम मेघे समिती - १९९० प्रा. पी. बी. पाटील समिती व सुखटणकर समिती १९९३ यांचा समावेश होतो. १९९४ साली महाराष्ट्र सरकारने तेव्हाचे शिक्षणमंत्री श्री. सलीम झकेरिया यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी एक कृतीगट स्थापन केला होता.

या कृती कार्यक्रमाचे मुख्य ध्येय महाराष्ट्रातील ६-१४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण पुरवणे होते. या कृतीगटाने महाराष्ट्रातील शिक्षणाच्या परिस्थितीचा अभ्यास करून कृती कार्यक्रमाची, ते कृती कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी विविध उपक्रमांची आखणी केली व त्यानुरुप आवश्यक असलेली आर्थिक तरतूदही अधोरेखित केली होती. १९९४ साली तयार केलेला राज्य कृती कार्यक्रम हा आज महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आखण्यात येणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाचा पाया आहे. राज्यातील शैक्षणिक उपक्रम व शासनाची या संदर्भातली कामगिरी समजावून घेण्यासाठी हा कृती कार्यक्रम काय होता हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

### कृती कार्यक्रमाची उद्दिष्टे

१) **शैशवावस्थेतील निगा व बालशिक्षण** : या कार्यक्रमाखाली बालवाड्या, अंगणवाड्यां इत्यादीच्या माध्यमातून ०-६ वयोगटातील एकूण ३८.२३ लाख मुलांपर्यंत हा कार्यक्रम नेला जाईल. यामध्ये १९.६ मुले व १८.६ लाख मुलींचा समावेश होतो.

२) **प्राथमिक शिक्षण** : सन २००० पर्यंत ११०.०३ लाख मुले (५६.५७ मुलगे व ५३.४६ मुली) या इयत्ता १ ली ते ४थीपर्यंत शाळेमध्ये शिक्षण घेत असतील. अनुसूचित जाती- जमातींमधील मुलांसाठी हेच ध्येय अनुक्रमे १४.८६ व १०.२४ लाख असे होते. त्यासाठी एकूण ७९२ नावे व १ हजार ३८ पाड्यांमध्ये नव्या शाळा सुरू करणे आवश्यक आहे व सध्या असलेल्या शाळांमध्ये ८०,०७७ वर्गखोल्या बांधण्याचे उद्दिष्ट ठरवले होते.

३) **प्रौढ व निरंतर शिक्षण** : महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये संपूर्ण साक्षरता अभियान पूर्ण केले जाईल.

वरील उद्दिष्टे गाठण्यासाठी पुढील माध्यमांचा उपयोग केला जाईल.

**अ) प्राथमिक शिक्षणासाठी भरती व गळती रोखणे :**

१) सूक्ष्मनिरीक्षण.

२) भौतिक सोयी सुविधा पुरवणे.

३) विविध उपक्रम.

४) शैशवावस्थेतील निगा व बालशिक्षण देणे.

५) प्राथमिक शिक्षकांची भरती.

६) पालकांवरील शिक्षणाच्या खर्चाचा भार कमी करणे.

**ब) मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य :**

१) प्राथमिक शाळांमध्ये शिक्षिकांची भरती किमान ५० टक्के पर्यंत वाढवणे.

२) शैक्षणिक सुविधा पुरवणे.

३) लोकसहभाग वाढवणे.

४) मुलींच्या गरजांना प्राधान्य देणाऱ्या व्यवस्था निर्माण करणे.

५) शैक्षणिक व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण.

**क) वंचित घटकांचे शिक्षण :**

१) शिक्षणावरील खर्चाचा बोजा कमी करणे यामध्ये ग्रामीण भागामध्ये शेतीच्या मोसमाप्रमाणे व दैनंदिन कार्यक्रम व सुट्ट्या निश्चित करणे.

२) आदिवासी भागातील मुलांसाठी वेगळे कार्यक्रम

३) वस्ती - पाड्यांजवळ शाळा उपलब्ध करून देणे

४) शिक्षणाची किमान गुणवत्ता गाठणे.

**ड) शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे :**

१) शिक्षकांची व शैक्षणिक अधिकाऱ्यांची प्रेरकशक्ती व गुणवत्ता वाढवणे

२) शैक्षणिक साहित्यांची गुणवत्ता वाढवणे

३) विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम वाढवणे

४) लोकसहभाग

**इ) शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढवणे :**

१) सेवांतर्गत प्रशिक्षण

२) शिक्षक प्रशिक्षण संस्थांची गुणवत्ता वाढवणे

३) जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थांची स्थापना

४) सेवापूर्व प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे.

**फ) शैक्षणिक व्यवस्थापन :**

१) शिक्षण व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण

२) शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी पर्यवेक्षण व्यवस्था

३) शाळा प्रशासकांचे प्रशिक्षण

४) सांख्यिकीय माहितीचे संगणकीकरण

**इ) लोकसहभाग :**

१. शिक्षणाची उद्दिष्टे, माध्यम, कार्यक्रम ठरवणे व राबविणे यामध्ये ज्यांना शिक्षण पुरवायचे, त्या सर्वांचा प्रत्यक्ष सहभाग

# महाराष्ट्रातल्या लोकशाही आघाडी सरकारने स्वीकृत केलेल्या समान किमान कार्यक्रमातील शैक्षणिक धोरण

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत :**

राज्य शासन प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करील. ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मूल शाळेत आणले जाईल व ते मूल किमान १४ वर्षांपर्यंत शाळेतून गळू नये म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करील.

अ) एकूण शिक्षणासाठी राज्यउत्पन्नाच्या किमान ७ टक्के रक्कम राखून ठेवण्यात येईल.

आ) शिक्षणासाठी राखून ठेवण्यात आलेल्या रकमेवर प्राथमिक शिक्षणाचा पहिला हक्क मान्य करून त्यापैकी ७५ टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी प्राथम्याने राखून ठेवण्यात येईल.

इ) प्राथमिक शाळेतील प्रत्येक वर्गासाठी किमान १ शिक्षक देण्याचा कार्यक्रम ८व्या पंचवार्षिक योजनेअखेर पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन शासनाने आपल्या कृती कार्यक्रमात दिलेले होते. त्याची अद्यापि पूर्तता झालेली नाही. ती कोणत्याही परिस्थितीत पुढील २ वर्षांत केली जाईल.

उ) बालमजूर प्रथेचे निर्मुलन करून ही सर्व मुले प्राथमिक शाळेत आणली जातील व ती किमान ८ वर्षे शाळेतून गळू नयेत म्हणून उपाययोजना केली जाईल. या मुलांच्यासाठी किमान १ लाख वर्ग खोल्या व १ लाख प्राथमिक शिक्षक पुरवावे लागतील. त्यासाठी करावा लागणारा खर्च राज्य शासन करील.

ऊ) प्राथमिक शाळेत एका वर्गाला एक शिक्षक मंजूर करताना त्या वर्गातील विद्यार्थी संख्या विचारात न घेता हे शिक्षक पुरविले जातील.

ए) आश्रमशाळांची संख्या अतिशय अपुरी आहे. ती वाढविण्यात येईल.या उपेक्षित समाज घटकातील ६ ते १४ वयोगटातील सर्वच्या सर्व मुले-मुली शाळेमध्ये दाखल करावयाची आहेत अशा हिशोबाने या आश्रमशाळांची संख्या वाढविण्यात येईल.

ऐ) उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात ऐपतवाल्या वर्गाला दिली जाणारी प्रच्छन्न सबसिडी तात्काळ बंद केली जाईल. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (आय. टी. आय.) माध्यमिक शाळांच्या धर्तीवर अनुदान दिले जाईल.

ओ) जोपर्यंत १४ वर्षांपर्यंतचे शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची शासनाची कुवत नाही तोपर्यंत ऐपतवाल्या वर्गांना माध्यमिक शिक्षण मोफत देण्याची व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांना प्रचंड सबसिडी देण्याची गरज नसल्याने त्याबाबत ताबडतोब उपाययोजना केली जाईल. ऐपतवाल्या पालकांच्या पाल्यांच्या माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी करावा लागणारा बहुतांश खर्च या पालकांना करावा लागेल अशा हिशोबाने माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण क्षेत्रातील शुल्काची फेर आकारणी केली जाईल.

औ) प्राथमिक शाळांतून किमान वर्गवार एक शिक्षक उपलब्ध केला जात नाही तोपर्यंत पहिल्या इयत्तेपासून इंग्रजी शिकविण्याची व्यवस्था केली जाणार नाही.

अं) माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्याक्षेत्रात जे अभ्यासक्रम राबविले जात आहेत ते बहुतांशी कालबाह्य झालेले असल्याने २१ व्या शतकाच्या आव्हानंना थेट भिडू शकतील असे विद्यार्थी त्यामधून तयार होत नाहीत. या शतकाची आव्हाने लक्षात ठेवून या अभ्यासक्रमांची संपूर्ण पुनर्घटना केली जाईल.

अ:) या नव्या आव्हानामध्ये माहिती तंत्रज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. ते एक अभूतपूर्व सामर्थ्य ठरत आहे. २१ व्या शतकाचा परवलीचा शब्द बनलेल्या या क्षेत्रात राज्यातील युवक - युवती यत्किंचितही मागे राहणार नाही अशा दक्षतेने व सतर्कतेने हा कार्यक्रम राबविला जाईल.

क) हे शिक्षण घेण्याच्या मार्गात, विद्यार्थ्यांच्या पालकांचे दारिद्र्य, अडसर ठरणार नाही याची शासन दक्षता घेऊ.

राज्यात बाल मजूरांची संख्या फार मोठी असून त्यांच्यापैकी अनेक बालमजूर धोकादायक व्यवसायात मजुरी करीत आहेत. ही प्रथा भारतीय राज्यघटनेतील तरतुदीशी पूर्णपणे विसंगत आहे. प्राथमिक शिक्षणसक्तीचे व मोफत करण्यानेच बालमजूर प्रथेचे निर्मुलन करता येणे शक्य असल्याने व धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल.

## महाराष्ट्रातील शैक्षणिक स्थिती

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील शैक्षणिक चित्र पुढील प्रमाणे —


- महाराष्ट्राची लोकसंख्या १९९१ च्या जनगणनेप्रमाणे ७६.९ कोटी - यापैकी ६१.३१ टक्के ग्रामीण भागात राहतात तर ३८.६९ शहरी भागात वास्तव्य करून आहेत.
- महाराष्ट्रात एकूण साक्षरता दर ६४.३७ टक्के आहे तर स्त्री साक्षरता - ५२.३२ टक्के आहे. म्हणजेच महाराष्ट्रात एकूण निरक्षरांची संख्या ४६ टक्के आहे. व अनुसूचित जाती जमातीतील लोकांपैकी ७१ टक्के लोक निरक्षर आहेत. या घटकातील स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण त्याहून जास्त आहे. उदा. कातकरी समाजातील फक्त १ टक्का स्त्रिया साक्षर आहेत.
- ग्रामीण भागातील ४५ टक्के लोक निरक्षर आहेत.
- महाराष्ट्रात ६-१४ या वयोगटातील मुलांची एकूण संख्या १,७१,०९,००० इतकी आहे. यापैकी १,२१,६९,५५४ मुले शाळेत असून ४९,३९,४४६ मुले शाळेच्या बाहेर आहेत. ७१ टक्के मुले शाळेत आहेत म्हणजेच शाळेत दाखल करण्याच्या वयातील मुलांपैकी २९ टक्के मुळे शाळेच्या बाहेर आहेत.
- शाळेत दाखल केलेल्या मुलांपैकी १८.९७ मुले अनुसूचित जातीची आहेत व १५.८६ टक्के अनुसूचित जमातींपैकी आहेत. अनुसूचित जातीची ८० टक्के व अनुसूचित जमातीची ८५ टक्के मुले अद्यापही शाळेबाहेर आहेत.
- राज्यामध्ये एकूण ६१,७८३ प्राथमिक शाळा आहेत. यापैकी फक्त ३,१३५ खाजगी व्यवस्थापनाखाली आहेत.
- राज्यामध्ये या घडीला ७२,००० वर्गखोल्यांचा अनुशेष आहे. महाराष्ट्रात असलेल्या ३,९७,९४९ शाळा इमारतींपैकी फक्त २७,९९७ पक्क्या इमारती आहेत. उरलेल्या पैकी २,३३७ कच्च्या १,२५५ तंबूमध्ये भरणाऱ्या ७,३३१ अर्धपक्क्या ६४८ झोपडीमध्ये भरणाऱ्या तर ३७९ शाळा या उघड्यावर भरणाऱ्या आहेत.
- राज्यात एकूण ३,२०,३८२ शिक्षक आहेत. त्यापैकी ४१.३८ स्त्री शिक्षिका आहेत. महाराष्ट्रात विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर हे १:३७ असे आहे. सध्या शिक्षकांच्या १८,००० जागा रिक्त आहेत.
- राज्यामधील एकूण बालमजुरांच्या संख्येबाबत एकवाक्यता नाही. शिक्षण खात्याने दिलेल्या सांख्यिकीनुसार राज्यामध्ये १०,६९,४१८ बालमजूर आहेत. १९९१ च्या जनगणनेनुसार शाळेबाहेरील मुलांची एकूण संख्या ६६,०३,००७ इतकी आहे. युनिसेफ व युनेस्कोच्या व्याख्येनुसार ही सर्व मुले संभाव्य बालमजूर आहेत. या मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नावर गेली दोन तीन वर्षे सातत्याने चर्चा सुरू आहे.
- प्रतिकूल परिस्थितीतील मुले, रस्त्यावर राहणारी मुले, वेश्यांची मुले, कैद्यांची मुले, शारिरीक व मानसिकदृष्ट्या अपंग मुले याबाबत अधिकृत पातळीवर निश्चित माहिती उपलब्ध नाही.
- महाराष्ट्रात आज अपंगासाठी एकूण १२९ शाळा असून तेथे ९,१०४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांपैकी ५५ शाळा या ग्रामीण भागामध्ये असून तेथे २,९९८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
- १९९७ साली महाराष्ट्र शासनाने विशेष कृतीगटाची स्थापना केली होती. या कृतीगटाने आपला अहवाल १९९८ साली सादर करूनही या सर्व मुलांना शिक्षण देणारी योजना सन २००१ पर्यंत कार्यान्वित करण्यात आलेली नाही.
- महाराष्ट्रात १९९१ च्या जनगणनेनुसार १,१५,८७,००० बालके ०-६ या वयोगटात मोडतात. या बालकांची शैशवावस्थेतील निगा व बालशिक्षणासाठी राज्यसरकार बालवाडी व केंद्रशासनपरस्कृत

अंगणवाड्या चालवते. आज महाराष्ट्रात १७,१९२ बालवाड्या असून या बालवाड्यांमध्ये जाणाऱ्या मुलांची संख्या ४,७९,६२६ इतकी आहे. शासनाच्या आकडेवारीवरून एकूण ४,४२,३९४ मुलांना बालवाडीची सोय उपलब्ध असणे अपेक्षित होते. परंतु ही सोय उपलब्ध नाही.

- महाराष्ट्रात जागतिक बँक सहाय्यित व केंद्रशासन अनुदानित एकूण ४६.२६८ इतक्या अंगणवाड्या मध्ये ३-६ वयोगटातील मुलांसाठी आरोग्य तपासणी, लसीकरण, संदर्भ सेवा अनौपचारिक शिक्षण, पोषक व आरोग्य शिक्षण या सेवांबरोबरच मुलांना पूरक आहार पुरवला जातो. एकूण आज ४४.७० मुले या सेवांचा लाभ होतात. म्हणजेच ०-६ या वयोगटातील जवळ जवळ निम्म्या मुलांसाठी आज काहीच कार्यक्रम सरकारकडून राबवले जात नाहीत.
- वास्तविकत: १९९७ साली सरकारने बालशिक्षणाबाबत महाराष्ट्रातील परिस्थिती अभ्यासून सर्वंकष कायदा करण्यासाठी प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीचा अहवाल शासनाने राबविला तर नाहीच परंतु प्रकाशित ही केली नाही. बालवाड्यांच्या एकूण दर्जा व गुणवत्ता याबरोबरच अंगणवाडी व बालवाडी यातील गुणात्मक फरक स्पष्ट केला आहे.
- १९९७-९८ सालच्या महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने प्रकाशित केलेल्या सांख्यिकीवरून वरील चित्र घेतले आहे. परंतु प्रत्यक्षात दरवर्षी स्थूलपातळीवर या चित्रात शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार फेरफार घडत असतात. शासनाच्या योजना व कार्यक्रम खरे किती प्रत्यक्षात येणार हे शासनाचा अर्थसंकल्प ठरवत असतो. गेली तीन वर्षे शासन अर्थसंकल्पात शिक्षण विषयक काय तरतुदी केल्या, व प्रत्यक्षात राखून ठेवलेल्या रकमेचा विनियोग किती व कसा केला याचा आढावा पुढील विभागात घेतला आहे.

## शालेय शिक्षण विभाग


### शालेय शिक्षण विभागावर होणाऱ्या खर्चाचा कल दाखविणारा आलेख




| | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकलीय अंदाज | २१९१.७१ | २६३५.११ | ३१३६.१८ | ३६४१.६६ | ४०५६.८४ | ५५५२.८७ | ५९७७.१६ |
| सुधारित अंदाज | २५१३.६२ | ३१८५.७१ | ३७२३.७२ | ४१६४.३७ | ४६२९.२४ | ८५९९.६५ | |
| प्रत्यक्ष खर्च | २५७८.४४ | ३१५३.३१ | ३६८६.९९ | ४३०४.०३ | ४६५६.४९ | | |

वरील आलेख पाहून असे दिसून येते की, १९९९-२००० च्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत २०००-२००१ चा अर्थसंकल्पीय अंदाज रु. २६२२.५ कोटींनी घटला आहे. तसेच १९९९-२००० च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत २०००-२००१ चा अर्थसंकल्पीय अंदाज रु. ४२४.३ कोटींनी अधिक आहे.

### शालेय शिक्षण विभागावर होणारा योजनांतर्गत खर्च दर्शविणारा आलेख





| | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाजित | १११.८८ | २३९.७ | ३५२.८४ | १७२.८३ | २१९.३४ | २३२.१८ | २०६.७८ |
| सुधारित अदाज | १५६.३४ | २९६.३५ | ४१०.४८ | २८१.२४ | २५६ | २८२.६८ | |
| प्रत्यक्ष | १५७.९६ | २७९.८२ | ३६९.६७ | २३६.१७ | २१०.३५ | | |

योजनांतर्गत खर्च हा नवीन योजना राबविण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असतो. योजनांतर्गत खर्चामध्ये घट होणे हे अतिशय गांभिर्याने घेतला पाहिजे.

वरील आलेख पाहून असे दिसून येते की, १९९९-२००० च्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत २०००-२००१ चा अर्थसंकल्पीय अंदाज रु. ७५.९ कोटींनी घटला आहे. तसेच १९९९-२००० च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत २०००-२००१ चा अर्थसंकल्पीय अंदाज रु. २५.४ कोटींनी घटला आहे.

**प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा कल दाखविणारा आलेख**




| | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १११०.४३ | १३३५.७३ | १६०६.८४ | १८४७.२५ | २०५९.८१ | २७१०.७७ | २९५८.५३ |
| सुधारित अंदाज | १२६५.१९ | १६०३.३२ | १९२३.९१ | २१२८.६१ | २३३१.२९ | ४३१०.६७ | |
| प्रत्यक्ष खर्च | १२६०.९२ | १५९०.९१ | १८६९.८१ | २१४६.९२ | २३२७.१८ | | |

वरील प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा कल पहाता असे दिसून येते की, १९९९-२००० च्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत २०००-२००१ चा अर्थसंकल्पीय अंदाज रु. १३५२.१४ कोटींनी घटला आहे. तसेच १९९९-२००० च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत २०००-२००१ चा अर्थसंकल्पीय अंदाज रु. २४७.७६ कोटींनी वाढला आहे.

प्राथमिक शिक्षण हा विकासाचा पाया असला तरी महाराष्ट्राचा शालेय शिक्षण विभाग हा पाया अधिकाधिक ठिसूळ कसा होईल आणि महाराष्ट्राच्या भविष्याला निरक्षरतेत कसे ढकलता येईल यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे. महाराष्ट्रात शंभरातील सत्तेचाळीस लोक निरक्षर आहेत. अनुसूचित जाती-जमातीतील ७१ लोक निरक्षर आहेत. पारधी, कातकरी यासारख्या आदिम जमातींची शिक्षणाची परिस्थिती भयावह आहे. शंभरातील ५ लोक देखील शिकलेले नाहीत. महिलांच्या बाबतीतले प्रमाण महाराष्ट्राची मान लाजेने खाली घालायला लावणारे आहे. कातकरी जमातीतील केवळ एक टक्के महिला साक्षर आहे. बालकामगारांचे प्रमाण ही धक्कादायक आहे. शालेय शिक्षण विभागाने प्रकाशित केलेल्या सांख्यिकी माहिती पुस्तिकेत १० लाख ६८ हजार ४१८ बालकामगार असल्याचे नमूद केले आहे. बालकामगारांसाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश शासनाने असेच गुंडाळून ठेवले आहे. १९९१ च्या जनगणनेप्रमाणे ६६ लाख ३ हजार ७ मुले शाळेत न जाता विविध प्रकारची कामे करित आहेत.

शालेय शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासन निधी उपलब्ध करून देत नाही. शाळे बाहेर असलेल्या म्हणजेच 'युनिसेफ' आणि 'युनोस्को'च्या व्याख्येप्रमाणे बालकामगार असलेल्या ६६ लाखांहून अधिक मुलांसाठी एका नव्या पैशाची तरतूद करणारी योजना शासनाने अजूनही आखली नाही. दुसऱ्या बाजूला प्रशासनाने उपलब्ध झालेला निधी खर्च न करता परत पाठवला.१९९४-९५ या वर्षात ४ कोटी २७ लाख २ हजार १९९५-९६ मध्ये १२ कोटी ४१ लाख ३० हजार १९९६-९७ मध्ये ५४ कोटी १० लाख ५० हजार १९९८-९९ मध्ये ४ कोटी १०

लाख ९६ हजार इतका खर्च प्रशासन करू शकले नाही. शालेय शिक्षण विभागाने दरवर्षी शिक्षणांवर दृष्टीक्षेप हे पुस्तक प्रकाशित करून विधीमंडळ सदस्यांना आणि जनतेला उपलब्ध करून द्यायचे आहे. १९९७-९८ नंतर म्हणजेच गेली तीन वर्षे हे पुस्तक प्रकाशित केलेले नाही.

प्राथमिक शिक्षणासाठी १९९२ साली एक विस्तृत योजना करण्यासाठी समिती नेमण्यात आली. शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी सर्वांकष योजना बनविणे हे या समितीचे काम होते. शिक्षणमंत्र्याच्या अध्यक्षेखाली या समितीने ज्या शिफारशी केल्या त्या शासनाने बासनात गुंडाळून ठेवल्या. ज्या तरतूदी अर्थसंकल्पात करण्यात आल्या त्याची अंमलबजावणीसुद्धा प्रशासनाने केली नाही आणि उपेक्षित मुलांना आपल्या ढिसाळ कारभाराने शिक्षणापासून वंचितच ठेवले.

महाराष्ट्रात सुमारे २० लाखाहून अधिक मुले शाळेत जात नाहीत हे शासनाचा अहवालच सांगतो. या मुलांना दाखल करून घेण्यासाठी काय करायचे याचे मार्गदर्शन शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या योजनेत नाही. महाराष्ट्रात सुमारे ३५ हजार प्राथमिक शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत त्या भरण्यासाठी शासनाची राजकीय इच्छा नाही.

## प्रा. राम जोशी समितीचा अहवाल व बालशिक्षण

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंदर्भात आणि दूरच्या खेड्यात अधिक मुले शाळेमध्ये येण्यासाठी पाया तयार व्हावा यासाठी **छोट्या खेड्यातून व गलिच्छ वस्त्यातून बालवाड्या उघडण्याचे** ठरविण्यात आले आहे. शासनाने ही योजना राबविण्यात सुरुवात केल्यापासून आर्थिक चढउतार लक्षात घेतले तर १९९५-९६ पासून ह्या योजनेवरील आर्थिक तरतूद उतरणीला लागल्याचे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

तक्ता क्र. १ (रुपये लाखात)

| १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| २१६.३५ | ३१४.२४ | ३८४.८७ | २१२.३९ | ११७.८२ | ५२.९७ | ६७.७३ |

बालवाड्या उघडणे ह्या योजनेवर १९९७-९८ व १९९८-९९ या आर्थिक वर्षात झालेला एकूण खर्च व योजनेची एकूण कामगिरी खालील प्रमाणे आहे. २०००-२००१ या वर्षात जरी जास्त नियतव्यय उपलब्ध केला असला तरी पंचवार्षिक योजनेच्या एकूण नियतव्ययापैकी ८% इतकाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

तक्ता क्र. २ (रूपये हजारात)

| बालवाड्यांची संख्या | | मुलांची संख्या | | केलेला खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| अपेक्षित | प्रत्यक्ष | अपेक्षित | प्रत्यक्ष | अपेक्षित | प्रत्यक्ष |
| १४६०७ | १७१९२ | ९२२०२० | ४७९६२६ | ४८४२९ | ७५२६६ |

शासनाने ही योजना राबविताना काही उद्दिष्टे ठरविली होती. परंतु ह्या योजनेची १९९७-९८ च्या आर्थिक वर्षामधील एकूण कामगिरी पाहिली तर शासनाचा कारभार किती ढिसाळ आहे याचा प्रत्यय येईल. खाली दिलेल्या तक्त्यात ह्या योजनेमध्ये बालवाड्यांची अंदाजित, अपेक्षित आणि प्रत्यक्षातील संख्या त्याचप्रमाणे त्यावर होणारा अंदाजित, अपेक्षित आणि प्रत्यक्षातील काही जिल्ह्यातील खर्च दिलेला आहे.

तक्ता क्र. ३ (रूपये हजारात)

| जिल्ह्याचे नाव | बालवाड्यांची संख्या | | मुलांची संख्या | | केलेला खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपेक्षित | प्रत्यक्ष | अपेक्षित | प्रत्यक्ष | अपेक्षित | प्रत्यक्ष |
| **भंडारा** | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **अकोला** | ८९ | ६१ | १७८० | २०४४ | ३१३ | २७० |
| अमरावती | ११८ | ११७ | २५९८ | ४०९५ | ४१३ | ४५३ |
| सोलापूर | ५१३ | ७६५ | १७९५५ | २२६४६ | २५६५ | ३७१४ |
| सांगली | ७८५ | ४१३ | ३१४०० | १७९५५ | २००० | २०३५ |
| **औरंगाबाद** | ३०४ | ३३९ | ९१८० | ९३६३ | ९९८५ | १४४४ |
| बीड | ८७२ | ५७८ | २५६२५ | १७३२० | २९३१ | २८९० |
| **जळगाव** | १२५१ | ११९४ | ३७८१५ | ३५८२० | ४३७८ | ३९४६ |
| **नाशिक** | ३८१ | ३८१ | ३९६१ | ६१६१ | १३७० | १३७० |
| रत्नागिरी | ८९३ | ६९७ | १९२९१ | १८०१८ | ४४६५ | ४५४४ |
| **ठाणे** | ११७३ | ५७६ | ३२८३५ | ३२८३५ | ३१०० | ३०४६ |

वंचित मुलांसाठी शासन आणि प्रशासन संयुक्तपणे योजनापुर्वक दुर्लक्ष करित आहे. कर्मचाऱ्याच्या संघटना आपल्या वेतनासाठी लढे देताना दिसतात परंतु जनतेसाठी आपले कर्तव्य मात्र त्याच्या विस्मरणात जाते. आंगणवाडी सेविकांना योग्य वेतन मिळावे हि मागणी करताना आंगणवाड्यांचा दर्जा आपले सभासद राखतात कि नाही हे पाहण्याचे कष्ट कर्मचाऱ्याचे पुढारी घेताना दिसत नाही आंगणवाड्या म्हणजे मुलांना केवळ सकस आहार देण्याची केंद्र झाली आहे. बालवाड्यांच्याबाबतीत ही परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. प्रा. राम जोशी समितीने बालवाड्या ह्या शिक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे असे सांगून बालवाडीचे स्वरुप राज्यभर एका विशिष्ट दर्जाचे असायला पाहिजे म्हणून मुलांना कृतीला व विचाराला भरपूर वाव मिळेल असा योग्य दर्जाचा पाठ्यक्रम आखला गेला पाहिजे आणि त्यासाठी शासनाने कायदा केला पाहिजे अशी शिफारस केली होती. शासनाने हा अहवाल जनतेपासून दडवून ठेवला, तो प्रकाशित केलाच नाही. त्यासाठी अक्षर प्रकाशनला हा अहवाल प्रकाशित करावा लागला. जेथे आंगणवाड्या आहेत तेथील बालवाड्या बंद करण्याचे शासनाचे धोरण चुकीचे आहे, कारण आंगणवाड्या व बालवाडीचे उद्देश भिन्न आहेत. त्यामुळे शासनाने आजच्या धोरणात बदल करावा अशी स्पष्ट शिफारस समितीने केली होती. परंतु शासनाने या संपूर्ण समितीच्या अहवालाच केराची टोपली दाखवली आहे. बालवाड्यांसाठी पंचवार्षिक योजनेत २५ कोटी रुपयांचा नियतव्यय राखून ठेवला होता प्रत्यक्षात मात्र केवळ २ कोटी ८ लाख ८४ हजार म्हणजे केवळ आठ टक्के तरतूद करण्यात आली. एकूणच, समाजातील आदिवासी, दलित आणि मागासवर्गीय बालकांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे नियोजनबद्ध प्रयत्न शासनाच्या अर्थसंकल्पात सातत्याने दिसून येतो. शिक्षणाचा अधिकार केवळ मुठभरांना आहे हा सनातन विचार महाराष्ट्राचे शासन पुरेपूर आचरणात आणीत आहे. हा शासनाचा लिखित ब्राम्हणवाद आहे.

शाळा नसलेल्या खेड्यांत नवीन शाळा उघण्याची शासनाची योजना अशीच कागदावर राहिली आहे. पंचवार्षिक योजनेत ३५ कोटींची अत्यल्प तरतूद करण्यात आली आणि प्रत्यक्ष १० कोटीचा सूद्धा निधी अर्थसंकल्पात देण्यात आला नाही.

गरिब आणि गरजू मुलांसाठी शासनाने त्याच्या गणवेशासाठी आणि पुस्तकांसाठी केलेल्या खर्चाचे प्रमाण पाहिले तर त्या बालकांच्या पदरी निराशाच आल्याचे दिसून येते. पंचवार्षिक योजनेत ७० कोटी १२ लाख ५६ हजाराची तरतूद करून प्रत्यक्षात ३२ कोटी १२ लाख १ हजार इतकीच तरतूद अर्थसंकल्पात केली गेली.

**प्राथमिक शिक्षणाकडे शासन पूर्णपणे आपली घटनात्मक जबाबदारी विसरून अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात दिसून येते. प्राथमिक शिक्षणांसाठी ७६६ कोटी १४ लाख ४० हजाराची तरतूद केली असताना अर्थसंकल्पात मात्र ३८६ कोटी २१ लाख ७३ हजार इतकीच तरतूद करून ५० टक्के निधी देखील उपलब्ध करून दिला नाही.**

### ४०% पेक्षा कमी साक्षरता असलेल्या जिल्ह्यांमधील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण दर्शविणारा तक्ता

| जिल्हा | साक्षरता प्रमाण (टक्केवारी) | | विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | स्त्रिया | एकूण | स्त्रिया |
| गडचिरोली | ३५.१७ | २३.६६ | ४०४८ | १३४० |
| जालना | ३६.३२ | २१.४६ | २९४३० | १७८२९ |
| परभणी | ३७.५६ | २३.२१ | ३१२६१ | १७२८६ |
| नांदेड | ३८.०३ | २४.३९ | ३२२३२ | १४७१८ |
| बीड | ३९.४८ | २६.२४ | ३४०५८ | १७३५१ |

गडचिरोली, जालना, परभणी, नांदेड, बीड या जिल्ह्यात सगळ्यात जास्त म्हणजे १०० पैकी ६० पेक्षाही जास्त लोक निरक्षर आहेत. या जिल्ह्यांमध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाणदेखील इतर जिल्ह्यांच्या तुलनेमध्ये खूप कमी आहे. जालना जिल्ह्यात स्त्री निरक्षरांची संख्या १०० मध्ये ७८ एवढी आहे. त्याचप्रमाणे या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण लाक्षणिक आहे.

महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ४७% लोक निरक्षर आहे असे १९९१ च्या जनगणनेतून निदर्शनास येते. काही मागासलेल्या जिल्ह्याची स्थिती तर अतिशय दयनीय आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पन्नास वर्षे झाल्यानंतरही गडचिरोली, बीड, जालना सारख्या जिल्ह्यांमध्ये शंभरातील साठच्यावर व्यक्ती निरक्षर आहेत.

महाराष्ट्र राज्यातील एकूण अनुसूचित जमातीमधील स्त्रियांमधील ८०% हून अधिक स्त्रिया निरक्षर आहेत. पुरुषांबाबतची परिस्थिती देखील फारशी वेगळी नाही. अनुसूचित जमातीमधील एकूण पुरुष लोकसंख्येपैकी ७०% हून अधिक पुरुष निरक्षर आहेत.

महाराष्ट्र राज्यातील एकूण अनुसूचित जातीमधील स्त्रियांमधील ६५% हून अधिक स्त्रिया निरक्षर आहेत. पुरुषांबाबतची परिस्थितीदेखील फारशी वेगळी नाही. अनुसूचित जातीमधील एकूण पुरुष लोकसंख्येपैकी ४०% हून अधिक पुरुष निरक्षर आहेत.

१९९४ सालापासून जो कृतिकार्यक्रम अंमलात आणायचा होता तो निधीअभावी तसाच पडून राहिला. राज्य शासनाने या कृतिकार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करून दिला नाही. **राज्यातील ७९२ गावे व १ हजार ३८ पाड्यांमध्ये शाळा नाहीत** त्यासाठी काहीही उपाययोजना शासनाने केली नाही. २००० सालापर्यंत ८० हजार ७७ वर्गखोल्या बांधण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. खालील तक्ता १९९७, १९९८ या सालामध्ये प्रत्यक्षात किती वर्गखोल्या बांधून झाल्या व १९९९ आणि २००० या सालामध्ये वर्गखोल्यांचे उद्दिष्ट किती आहे हे दर्शवितो.

| महाराष्ट्र राज्य एकूण | १९९७ | १९९८ | | १९९९ | २००० |
|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष | अंदाजित | प्रत्यक्ष | अंदाजित | अंदाजित |
| | ६९१३ | ६९४४ | ६६६८ | १०८५० | १००९३ |

प्रत्यक्षात ११ हजारसुद्धा वर्गखोल्या या वर्षापर्यंत बांधल्या गेल्या नाहीत. जिल्हापरिषदांच्या प्राथमिक शाळांच्या बांधकामासाठी पंचवार्षिक योजनेत २६६ कोटींची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात गेल्या चार वर्षात फक्त ५८ कोटी ८२ लाख ८ हजारांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली. म्हणजेच ७७ टक्के तरतूद न करून शालेय शिक्षणाला उपेक्षित ठेवले आहे. ठाणे जिल्ह्यांत १९९८ साली ७०० वर्गखोल्या बांधण्याचे उद्दिष्ट अर्थसंकल्पात व्यक्त केले आणि केवळ ७२ वर्गखोल्या बांधल्या गेल्या त्याचप्रमाणे अकोला जिल्ह्यात ५०० वर्गखोल्यांचे बांधकाम ठरविले असता केवळ १ वर्गखोली बांधली गेली. वाशिम जिल्ह्यांत १७० ऐवजी १,

अहमदनगर जिल्ह्यांत ९४५ ऐवजी १६०, सातारा जिल्ह्यांत ३०० ऐवजी ८९, बीड जिल्ह्यांत २७७ ऐवजी ४५, गडचिरोली जिल्ह्यांत ७५ ऐवजी १४ वर्गखोल्या बांधल्या गेल्या. चंद्रपुर जिल्ह्यांत १९९७ नंतर एकही वर्गखोली बांधली गेली नाही. याच गतीने जर शालेय शिक्षण विभाग कार्यरत राहिला तर हे लक्ष्य साध्य करायला पुढचे शतक उजाडेल.

(रूपये लाखात)

| योजनेचे नाव | नववी पंचवार्षिक योजना, १९९७-२००२ नियतव्ययय | प्रत्यक्ष खर्च १९९७-९८ व १९९८-९९ | वार्षिक योजना १९९९-२००० व २०००-२००१ | स्तंभ क्र. ३+४ ची स्तंभ क्र. २ शी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १) प्रा.शिक्षणाच्या नैसर्गिक वाढीमुळे प्रा.शाळा शिक्षकांच्या नेमणुकीसाठी जि.प.ना अनुदान (जिल्हा) | १,१६,९३.०० | १३२७.४९ | ६४८६.८८ | ६६.८२% |
| २) शाळा नसलेल्या खेड्यांत नवीन शाळा उघडणे - प्रा. शाळा शिक्षकांच्या नेमणुकीसाठी जि.प.ना अनुदान (जिल्हा) | ३५००.०० | १०३.२६ | ९३८.१८ | २९.७५% |
| ३) १०३ विकास गटातील इ. १ ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके (जिल्हा) | २२४३.६८ | ६५९.४७ | ९०१.०९ | ६९.५५ |
| ४) १०३ विकास गटातील इ. १ली च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य (जिल्हा) | ७०१२.५६ | १०३७.५९ | २१७४.४२ | ४५.८० |
| ५) प्रा.शाळांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणांना अनुदान (जिल्हा) | २६६००.०० | ३०७४.१३ | २८०७.९५ | २२.११% |
| ६) प्रा.शाळेत बालवाड्या सुरू करणे | २५००.०० | ८८.१४ | १२०.७ | ८.३५% |
| ७) जिल्हा स्तरावरील बालभवनाकरिता अनुदान | ३७.५० | २.१ | ९.७८ | ३१.६८% |

वरील तक्त्यावरून पंचवार्षिक योजनेमध्ये उपलब्ध करून दिलेला नियतव्यय व पंचवार्षिक योजनेचे ४ थे आर्थिक वर्ष चालू झाल्यानंतर त्यावर झालेला एकूण खर्च व उपलब्ध नियतव्यय समजतो. अनेक योजनांना अजून पर्यंत ५०% एवढा नियतव्यय उपलब्ध करून दिलेला नाही.

## राज्यस्तरीय योजनांसाठी केंद्रीय सहाय्य दर्शविणारा तक्ता

(रुपये लाखात)

| योजनेचे नाव | नववी पंचवार्षिक योजना, १९९७-२००० नियतव्ययय | प्रत्यक्ष खर्च १९९७-९८ व १९९८-९९ | वार्षिक योजना १९९९-२००० व २०००-२००१ | स्तंभ क्र. ३+४ ची स्तंभ क्र. २ शी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १)राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती | ५०.०० | -- | -- | शून्य खर्च |
| २)ऑपरेशन ब्लॅक बोर्ड योजना - साधनसामग्री व दुसऱ्या शिक्षकांचे वेतन | ७,२५,४४.६३ | -- | २२९९.०५ | ३.१६ |
| ३)नवसाक्षरांसाठी निरंतर शिक्षण | ६१,१५.१५ | -- | -- | शून्य खर्च |
| ४)प्राथमिक शाळांतून टी.व्ही.सेटस् पुरविणे | २२,५०.०० | ३९०.०० | ३९०.०० | |

वार्षिक योजना भाग-२ (२०००-२००१) या शासनाच्या प्रकाशनामध्ये केंद्रीय सहाय्याखाली येणाऱ्या योजनांचा उल्लेख केलेला आढळतो. यामध्ये प्राथमिक शाळांतून टी.व्ही.सेटस् पुरविणे ही एक योजना आहे. १९९७-२००२ या पंचवार्षिक योजनेअंतर्गत २२ कोटी ५० लाखाचा नियतव्यय या योजनेसाठी उपलब्ध करण्यात आला. परंतु १९९७ ते २००० सालापर्यंत या योजनेसाठी फक्त ७ कोटी ८० लाखाची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली. म्हणजेच जवळजवळ ६५% नियतव्यय अजून उपलब्ध करून देण्यात आला नाही.

**भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या अहवालाप्रमाणे दूरदर्शन संचावर रूपये ६६.२४ लाख एवढी निष्फळ गुंतवणूक केली गेली.**

१९९३-९४ मध्ये सुरु करण्यात आलेल्या नवशिक्षण तंत्रज्ञान कार्यक्रम यात केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील जिल्हा परिषदांमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांकरिता ८,००० रंगीत दूरदर्शन संच खरेदी करण्यासाठी राज्य शासनाने रूपये १०.४० कोटी एवढ्या रकमेस मंजूरी दिली. वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक, भौगोलिक व सांस्कृतिक परिस्थितीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे माध्यम म्हणून दूरदर्शनचा उपयोग करणे हे उद्दिष्ट होते.

राज्य शिक्षण तंत्रज्ञान संस्थेने खुल्या निविदा मागविल्या व १९९३-९४ व १९९५-९६ मध्ये संचांचा पुरवठा करण्यात आला. अभिलेखांची चाचणी दाखल तपासणी केली असता (डिसेंबर १९९६ ते ऑक्टोबर १९९७) असे दिसून आले की ७ जिल्ह्यांमध्ये वितरीत करण्यात आलेल्या ८८० रंगीत दूरदर्शन संचांपैकी रूपये ६६.२४ लाख किमतीच्या ५२० संचांचा वापर होऊ शकला नाही. ठाणे जिल्ह्यात ४२ शाळांमध्ये विज नसल्यामुळे, २४६ (सिंधुदुर्ग, सांगली व रत्नागिरी) प्रकरणांमध्ये शाळा प्रक्षेपण कक्षेच्या बाहेर असल्यामुळे , १६२ (रत्नागिरी, औरंगाबाद, रायगड, सातारा व ठाणे) प्रकरणांमध्ये निवडलेले संच सदोष / नुकसान पोहोचलेले असल्यामुळे आणि ७० (रत्नागिरी व औरंगाबाद) प्रकरणांमध्ये बुस्टर्सचा (उत्पेक्षक) पुरवठा न केल्यामुळे दूरदर्शन संच चालू होऊ शकले नाहीत.

राज्य शिक्षण तंत्रज्ञान संस्थेने अपात्र शाळांच्या निवडीबद्दल जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना जबाबदार धरले. भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या १९९८ च्या अहवालामध्ये ही बाब दर्शविण्यात आली आहे व शासनाला त्याबाबत कळवून देखील जानेवारी १९९९ पर्यंत याबाबतचे उत्तर मिळाले नाही.

## प्राथमिक शाळांची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा कार्यभार

शालेय शिक्षण विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये प्राथमिक शाळांची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा कार्यभार दाखविणारा तक्ता दिला आहे.

| वर्ष | एकूण प्राथमिक शाळा | प्रत्यक्षात पूर्ण केलेली तपासणी |
|---|---|---|
| १९९६-९७ | ५५,८२९ | ६४,४९५ |
| १९९७-९८ | ५६,४७३ | ५६,१५७ |
| १९९८-९९ | ६०,१११ | ६०,०४२ |

१९९७-९८ मध्ये ३१६ शाळांना तपासणी अधिकाऱ्यांकडून भेटीच दिल्या गेल्या नाहीत. १९९८-९९ या सालात ६९ शाळांना भेटी दिल्या गेल्या नाहीत. याबाबत कारवाई काय होते याचा उल्लेखही कुठे आढळत नाही.

१९९८-९९ मध्ये लातूरमध्ये तपासणी अधिकाऱ्यांनी ३१५ शाळांना भेट दिली गेली नाहीत; त्याचप्रमाणे अकोला येथे ७८ शाळांना, वाशिम येथे ३७ शाळांना, नागपूर येथे ६० शाळांना व गडचिरोली येथे २० शाळांना भेट दिली गेली नाही.

### जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्त्या

| जिल्हा | | एकशिक्षकी शाळेचे द्विशिक्षकी शाळेमध्ये रुपांतर | | | शाळा नसलेल्या खेडयात नवीन शाळा उघडणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संपूर्ण महाराष्ट्र | वर्ष | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ |
| | अपेक्षित | ४८९५ | ३७२५ | १३३२ | ५९२ | ७०४ | ५६२ |
| | प्रत्यक्ष | ४०५२ | १०६० | ० | ४४८ | ४०४ | ५८७ |

| जिल्हा | | एकूण नेमलेले जादा प्राथमिक शिक्षक | | | जिल्हा परिषदेला दिलेले अनुदान (रु. हजारात) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संपूर्ण महाराष्ट्र | वर्ष | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ |
| | अपेक्षित | ९४१९ | २२९९५ | ६४६३ | ३०६१४३ | १२५७५५३ | २७४९३६ |
| | प्रत्यक्ष | २२३९० | ३२३१ | ३१५६ | ११५८७८५ | ६४२२० | ५९७३३ |

वर दिलेल्या तक्त्यातून संपूर्ण राज्याची व पाच निवडक जिल्हयांची १९९६-९७ व १९९७-९८ मधील जि.प. मध्ये नेमणुका केलेल्या प्राथमिक शिक्षकांची माहिती दर्शविली आहे. शेवटच्या स्तभांत जिल्हा परिषदांना याकरिता दिल्या जाणाऱ्या अनुदानाची माहिती दिली आहे.

तक्त्यात नमूद केलेल्या ५ जिल्ह्यांची शिक्षक नेमणुकी बाबतची परिस्थती हलाखीची असून शासनाने शिक्षकांच्या प्रत्यक्ष नेमणुका अपेक्षित संख्येपेक्षा सतत कमी केल्याचे दिसून येते. हीच स्थिती राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये थोडयाफार फरकाने आढळते.

- ठाणे जिल्ह्यात १९९८-९९ मध्ये ४३१ एकशिक्षकी शाळांचे द्विशिक्षकी शाळांमध्ये रुपांतर करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात एकाही शाळेचे रुपांतर झाले. तसेच १९९८-९९ या वर्षी ५३२ जादा प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात नेमणूक ४०० शिक्षकांची केली गेली.

राज्यातील अंशकालिक वर्गांची संख्या दर्शविणारा तक्ता

| | | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० |
|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्रातील ३१ जिल्ह्यातील अंशकालिक वर्गांची एकूण संख्या | अंदाजे | | | १३६६ | ९५७ | १०२२ |
| | अपेक्षित | | १३२४ | ९४५ | ८९९ | ३८१ |
| | प्रत्यक्ष | १०५९ | ८३० | ७९० | २४७ | |

पारंपारिक पद्धतीने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणे शक्य नाही आणि म्हणूनच अंशकालिक वर्ग उघडण्याची कल्पना अस्तित्वात आली. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्यासाठी ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना १ ते ४ इयत्तांचा अभ्यासक्रम अंशकालिक वर्गात शिकविला जावा अशी अपेक्षा आहे. या विद्यार्थ्यांना सकाळी किंवा संध्याकाळी; त्यांना सोयीस्कर होईल त्याप्रमाणे अंशकालिक वर्ग चालविले जातात.

शालेय शिक्षण विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकानुसार या वर्गांची संख्या वाढविण्याऐवजी सरकार या वर्गांची संख्या कमी करत असल्याचे आढळले आहे. १९९५-९६ ते १९९८-९९ या कालावधीत अशा वर्गांची संख्या १०५९ वरुन २४७ इतकी घसरली; म्हणजेच ८१२ ने या संख्येत घसरण झाली आहे. याशिवाय ज्या जिल्ह्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय साक्षरतेच्या सरासरी प्रमाणापेक्षा म्हणजे ५२.११ टक्कयांपेक्षा कमी आहे, त्या ठिकाणी या अंशकालिक वर्गांची अवस्था हलाखीची असल्याचे दिसून येते.

**राज्यात निरक्षरांची संख्या ४७ टक्के असताना प्रौढ शिक्षणासाठी मुळातच ३८ कोटी ४२ लाखाची तरतूद पाच वर्षांसाठी करण्यात आली आणि प्रत्यक्ष खर्च मात्र १३ टक्केसुद्धा झाला नाही.**

**माध्यमिक शिक्षणाबाबतचे शासनाचे धोरण ही काही वेगळे नाही. १,१३४ कोटी ६१ लाख ९२ हजाराची पाच वर्षासाठी करण्यात आली असताना ४४७ कोटी ७ लाख ६१ हजार एवढीच अर्थसंकल्पीय तरतूद करून ६० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही.**

## शालेय शिक्षण विभाग

### प्राथमिक शिक्षण - विद्यार्थी संख्या गळतीचे प्रमाण ( महाराष्ट्र राज्य)

| वर्ष | विद्यार्थी संख्या (हजारात) | एकूण विद्यार्थी संख्येशी गळतीचे प्रमाण |
|---|---|---|
| १९८४-८५ | ४,३६० | ५५.९७ टक्के |
| १९८५-८६ | ४,२८० | ५४.२४ टक्के |
| १९८६-८७ | ४,१६६ | ५२.२१ टक्के |
| १९८७-८८ | ४,१४३ | ५१.२४ टक्के |
| १९८८-८९ | ४,१९५ | ५०.९८ टक्के |
| १९८९-९० | ४,२७६ | ५०.९२ टक्के |
| १९९०-९१ | ४,३३१ | ५०.३९ टक्के |
| १९९१-९२ | ४,३८३ | ४९.७६ टक्के |
| १९९२-९३ | ४,३३७ | ४८.४१ टक्के |
| १९९३-९४ | ४,२८३ | ४६.६६ टक्के |
| १९९४-९५ | ४,२२९ | ४५.३३ टक्के |
| १९९५-९६ | ४,२२० | ४४.४४ टक्के |
| १९९६-९७ | ४,२५६ | ४४.०० टक्के |
| १९९७-९८ | ४,१२४ | ४२.२५ टक्के |

| | |
|---|---|
| २५,६६,१८५ | पहिलीतील विद्यार्थी संख्या |
| २१,७६,०८८ | चौथीतील विद्यार्थी संख्या |
| ३,९०,०९७ | (१ ली ते इयत्ता ४ थी पर्यंत गळती झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या) |

(स्त्रोत : शिक्षणावर दृष्टिक्षेप १९९७-९८)

## महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी चाललेले आंदोलन

भारतीय राज्यघटनेने देशातील सर्व मुलांना सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचे अभिवचन दिले आहे. परंतु महाराष्ट्र शासनाकडे या मुलांसाठी शिक्षणाचा मुलभूत हक्क मागितला असता शासनाकडून मात्र शिक्षणासाठी पैसाच नसल्याचे उत्तर मिळत होते. यास प्रत्युत्तर म्हणून दिनांक २४ मार्च १९९८ रोजी 'श्रमजीवी संघटना व विधायक संसद' या ठाणे जिल्ह्यातील संघटनांनी 'भिकमोर्चा'चे आयोजन केले होते. मुलांनी स्वत: रस्त्यावर भिक मागून मुख्यमंत्री निधीसाठी १०३३ रुपये जमविले.

यामुळे खजील झालेल्या मुख्यमंत्र्यांनी त्याच दिवशी वंचित बालकांच्या शिक्षणासाठी एका कृतीगटाची निर्मिती करण्याचे जाहीर केले. प्रत्यक्षात कृतीगट अस्तित्वात येण्यासाठी ८ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी गेला. दिनांक १२ नोव्हेंबर १९९८ रोजी मान. शालेय शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली या कृतीगटाची स्थापना करण्यात आली. या कृतीगटातील एका त्रिसदस्यीय उपगटाने (श्री. विवेक पंडित - समर्थन, श्रीम. विजया चौहान - युनिसेफ, व श्री. दिलीप गोगटे - संचालक, शालेय शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे) प्रत्यक्ष योजनेचा मसुदा तयार केला. योजनेला नाव देण्यात आले 'मुक्तशाळा योजना'. दिनांक २८ फेब्रुवारी २००० रोजी मान. शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत कृतीगटाने सदर योजना स्विकारली. त्याचप्रमाणे ११ एप्रिल २००० रोजी शिक्षण खात्यावरील चर्चेसमयी सदर योजना स्विकारल्याचे व ती राज्यात लागू करण्याचे आश्वासन मान. शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत दिले.

शासनाकडून आश्वासनांवर आश्वासने मिळतात परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणी काही होत नाही हे पाहून दिनांक १४ ऑगस्ट २००० रोजी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला ''कोरी पाटी'' मोर्चाचे आयोजन करण्यात आले. स्वातंत्र्याच्या ५० वर्षानंतरही कोऱ्याच राहिलेल्या आपल्या पाट्या व तिरंगा घेऊन आलेल्या शिक्षणापासून वंचित मुलांना माननीय मुख्यमंत्र्यांनी 'मुक्तशाळा योजना' २ ऑक्टोबर २००० पासून जशीच्या तशी लागू करण्याचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात मात्र दिनांक १३ ऑक्टोबर २००० रोजी 'महात्मा फुले शिक्षण हमी योजना' शासनाने जाहीर केली.

विरोध दोन योजनांमधील नावाच्या फरकाला नाही. परंतु 'मुक्तशाळा योजना व महात्मा फुले शिक्षण हमी योजने'तील तरतूदी व उद्दिष्टांमधील तफावत पाहता 'मुक्तशाळा योजने'चाच आग्रह धरणे क्रमप्राप्त आहे. 'महात्मा फुले शिक्षण हमी योजना' ही सध्या फक्त १५ जिल्ह्यात लागू केली जाणार असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये योजनेची अंमलबजावणी कधी केली जाईल याचा उल्लेख शासन निर्णयात नाही. याशिवाय ज्या १५ जिल्ह्यांमध्ये ती राबविली जाईल असे सांगितले जात आहे तेथे 'जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम' व 'आशा' हे अनुक्रमे 'जागतिक बँक व युनिसेफ' यांच्या अर्थसहाय्यावर चालणारे प्रकल्प सुरू आहेत. याच प्रकल्पांना या नव्या योजनेचे नाव देण्यात येणार आहे. याचाच अर्थ ही कोणत्याही प्रकारे नवी योजना नाही तर १५ जिल्ह्यातली प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्टही पूर्णपणे गाठू न शकलेल्या प्रकल्पांचे निव्वळ नामांतर आहे.

शाळाबाह्य मुलांच्या गरजांवर आधारित दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे आणि या सर्व मुलांना शाळा व्यवस्थेत समाविष्ट करून घेणे हा मुक्तशाळा योजनेचा उद्देश होता. स्थलांतरित मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे हे 'मुक्तशाळा योजने'चे वैशिष्ट्य होते. परंतु महात्मा फुले शिक्षण हमी योजनेत मात्र मुलांच्या विशेष गरजांचा उल्लेख केलेला नाही.

शारिरीक व मानसिकदृष्ट्या अपंग मुलांना नजिकच्या शाळेत प्रवेश अनिवार्य करणे. भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भागात शाळा सुरू होण्यासाठी प्राधान्य देणे तसेच बिनधोकादायक उद्योगात काम करणाऱ्या मुलांच्या मालकाने शाळेसाठी वेळ व जागा उपलब्ध करून देणे, मुलांच्या करमणुकीसाठी तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी मनोरंजनाच्या तासाची तरतूद, सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व लेखन साहित्य शासनाकडून नि:शुल्क पुरविले जाणे अशा अनेक तरतुदींचा महात्मा फुले शिक्षण हमी योजनेत अभाव आहे.

महात्मा फुले शिक्षण हमी योजनेतील या त्रुटी पहाता महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी चाललेले आंदोलन सुरूच ठेवावे लागणार आहे यात वाद नाही.

## शिफारसी

जागतिक बँकेने जो मानवी विकास निर्देशांक प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये १७८ देशांच्या यादीत भारताचा क्रमांक १३५ वा आहे. शिक्षण आरोग्य व इतर सामाजिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी जेवढा खर्च केला जातो. त्यापेक्षा अधिक खर्च संरक्षणखात्यावर करणारे फक्त ६ देश जगाच्या पाठीवर आहेत आणि भारत हा त्या ६ देशांपैकी एक आहे.

भारतीय राज्य घटनेच्या सरनाम्यामध्ये भारतीय जनतेला सामाजिक आर्थिक व राजकीय न्याय व संधीची समानता यावर आधारित एक न्याय्यव्यवस्था देण्याचे अभिवचन आहे. ही न्याय्यव्यवस्था आणण्यासाठी सत्ता, संपत्ती, ज्ञान यांचे समान वाटप होण्याची गरज असते. परंतु हे प्रगतीचे स्त्रोत आज मात्र मूठभर लोकांच्याच हाती केंद्रित झालेले दिसतात. देशातील २० टक्के श्रीमंत विभागाने राष्ट्रीय संपत्तीच्या ४९ टक्के हिस्सा अडवून ठेवला आहे तर सर्वात खालच्या स्तरातील २० टक्के जनतेकडे फक्त ७ टक्के एवढा नगण्य हिस्सा आहे. आणि याच बहुजन वर्गातील जवळजवळ ८० टक्के समाजाला आजच्या या शिक्षण व्यवस्थेचा कसलाही लाभ होत नाही. ग्रामीण भागातील ४० टक्के मुले अनुसूचित जातीच्या ७० टक्के मुली तर अनुसुचित जमातीच्या ८० टक्के मुली आज शाळेतच येत नाहीत. आणि आपल्या ५८ टक्के श्रमशक्तीचे कसलेही शिक्षणच झालेले नाही. परिणामी आपण मानव संपत्तीची म्हणजेच राष्ट्रीय संपत्तीची धूळधाण करीत आहोत. ही धूळधाण रोखण्यातील पहिले पाऊल शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हेच आहे. ते अंमलात आणण्यासाठी पुढील गोष्टी आपणास तातडीने करायला लागतील.

१) प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मुलभूत हक्क म्हणून मान्य करणारी ८३वी घटना दुरुस्ती सुधारित स्वरुपात ताबडतोब मंजूर करण्यात यावी.

२) या घटनादुरुस्तीच्या विधेयकामध्ये पुढील बदल करावेत.

अ) वयोगट हा ६ ते १४ न ठेवता ० ते १८ करावा. ज्या जोगे ०-६ वयोगटातील मुलांना शिशुविकास व बालशिक्षणाच्या संधी सरकारतर्फे पुरवल्या जाऊ शकतील.

ब) सक्तीचे व मोफत ही संकल्पना स्पष्टपणे मांडण्यात यावी व शिक्षण पुरवण्याची सक्ती ही सरकारवर असावी, मुलांच्या पालकांवर नाही.

क) देशामध्ये शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आवश्यक असलेली वाढीव अर्थसंकल्पीय तरतूद केली जावी. कोठारी आयोग व मुजुमदार समितीने केलेल्या शिफारसीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६ टक्के हिस्सा हा शिक्षणावर व त्या तरतुदींपैकी किमान ५० टक्के हिस्सा हा केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च केला जावा.

३) प्राथमिक शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या रकमेपैकी किमान २० टक्के रक्कम शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या विभागासाठी राखून ठेवण्यात यावी.

४) एकशिक्षकी व दोन शिक्षकी त्याचप्रमाणे अंशकालिन वर्ग, अनौपचारीक वर्ग अशा शिक्षणाच्या पुरवठा व गुणवत्ता कमी करणाऱ्या पद्धती ताबडतोब बंद करून प्रत्येक वर्गामागे एक शिक्षक व प्रत्येक वर्गावर किमान ६ तासांची दैनिक शिकवणी घेतली जावी. राज्यामध्ये असलेल्या शिक्षकांचा अनुशेष ताबडतोब भरला जावा व सर्व शिक्षकांना समान आर्थिक वागणूक मिळावी.

५) प्राथमिक शिक्षण जोपर्यंत सक्तीचे व मोफत केले जात नाही. तोपर्यंत माध्यमिक शिक्षण मोफत केले जाऊ नये. सक्तीचे व मोफत शिक्षण इयत्ता १०वी किंवा वयाच्या १८ व्या वर्षांपर्यंत दिले जावे व त्यानुसार शैक्षणिक सुविधांची सोय सरकारने करावी.

६) सध्या विविध कारणांमुळे शाळेबाहेर असणाऱ्या मुलांना शिक्षण पुरवण्यासाठी एका कालबद्ध कार्यक्रमाची आखणी सरकारने करावी. यासंदर्भात सरकारने नेमलेल्या विशेष कृतीगटाचा अहवाल मुक्तशाळा

योजना स्वरुपात सरकारला सादर केला आहे. त्याची विनाविलंब व कसलीही तडजोड न करता ताबडतोब अंमलबजावणी केली जावी.

७) माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात ऐपतवाल्या पालकांना देखील जी सबसिडी दिली जाते ती बंद केली जावी. या क्षेत्रातील शिक्षणाचा दरडोई खर्च विचारात घेऊन शुल्काची फेर आकारणी केली पाहिजे. गोरगरीब थरातल्या आणि अनुदानित जाती, जमाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर फ्री शिप, शिष्यवृत्त्यांचे संच उपलब्ध केले जावेत.

८) जे विद्यार्थी सवलतीच्या दरात शिक्षण घेतात, त्याचबरोबर छुप्या सबसिडीचा फायदा घेऊन विशेषत: अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रामध्ये पदव्या संपादन करतात त्यांनी भविष्यात स्वत:च्या पायावर उभे राहिल्यानंतर या सवलतीच्या रकमेची परतफेड केली पाहिजे. शिक्षणातील लोक सहभाग हा केवळ पालक व शिक्षण समित्या यापुरताच मर्यादित न ठेवता. शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक घटकाने शिक्षणक्षेत्रात संसाधने किंवा सेवा स्वरुपात योगदान दिलेच पाहिजे.

९) उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये पैशाच्या चलनास किमान महत्त्व देऊन श्रमाच्या मोबदल्यात उच्चशिक्षण उपलब्ध करण्याच्या कर्मवीर भाऊराव पाटीलांच्या प्रयोगांची पुनरावृत्ती केली पाहिजे. विद्यापीठीय अभ्यासक्रम कालबाह्य न ठरता जर त्यांचा दैनंदिन जीवनाशी संपर्क व संबंध राहायचा असेल तर या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करून श्रम व ज्ञान यांची सांगड घातली गेली पाहिजे.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे व राष्ट्रबांधणीचे साधन आहे त्याचबरोबर अस्तित्वात असलेल्या समाजरचनेचा शिक्षणव्यवस्था एक अविभाज्य असा भाग असते. भारतातील सांस्कृतिक विविधतेवर आधारित बहुप्रवाही समाजरचना लक्षात घेता, एकाच संस्कृतीचे, विचारधारेचे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील आक्रमण हे शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांशी विसंगत आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ही जी सांस्कृतिक मक्तेदारी लादली जात आहे, तिचा प्रतिकार या क्षेत्रातील सर्व सजग, कार्यशील व्यक्ती, संस्था करतील यात शंकाच नाही.

---

**या अहवालातील माहिती मुख्यत: खालील स्त्रोतांवरून घेतली आहे.**

१. जगातील मुलांची स्थिती - १९९९ (युनिसेफ प्रकाशन)
२. ६ वे राष्ट्रीय शिक्षण सर्वेक्षण - (एन. सी. इ. आर. टी. प्रकाशन)
३. पिपल्स रिपोर्ट ऑन बेसिक एज्युकेशन
४. शिक्षणावर दृष्टिक्षेप (शिक्षण संचालनालय, पुणे)